# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ७ जून २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ५४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## शेअर बाजारात 'ब्लॅक-मंडे'चे संकेत ?



तभा वृत्तसेवा

मुंबई : भारतीय शेअर बाजारात सोमवारी घसरण दिसण्याची शक्यता आहे. याचे कारण अमेरिकन बाजारातील मोठी घसरण आहे, जिथे रोजगाराच्या दमदार आकडेवारीनंतर बॉण्ड यील्ड्स वाढले, ज्यामुळे गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात विक्री केली. या जागतिक मंदीचे प्रतिबिंब निफ्टीमध्येही दिसून आले, जो रातोरात १.५% पेक्षा जास्त घसरला. यावरून असे समजते की दलाल स्ट्रीटवर नवीन आठवड्याची सुरुवात कमजोर होऊ शकते आणि गेल्या आठवड्यातील घसरण कायम राहू शकते. निफ्टी ३५६ अंकांनी, म्हणजेच १.५२% ने घसरून २३,०९१ वर बंद झाला, ज्यामुळेसोमवारी दलाल स्ट्रीटवरनकारात्मक सुरुवातीचे संकेत मिळत आहेत. गेल्या आठवड्यातही भारतीय बाजारपेठा दबावाखाली होत्या आणि प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. शुक्रवार, ५ जून रोजी, बीएसई सेन्सेक्स ११७ अंकांनी घसरून ७४,२४३ वर बंद झाला. निफ्टी ५० देखील ५० अंकांनी घसरून २३,३६७ वर बंद झाला. जागतिक बाजारपेठांमध्ये घडणाऱ्या हालचालींवर गुंतवणूकदार लक्ष ठेवून असतील. शुक्रवारी अमेरिकन शेअर बाजारात लक्षणीय घसरण दिसून आली. याचे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेकडून आलेली अपेक्षेपेक्षा चांगली रोजगारविषयक आकडेवारी. मजबूत आर्थिक आकडेवारी सामान्यतः बाजारासाठी सकारात्मक मानली जाते. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची ताकद पाहता, फेडरल रिझर्व्ह लवकरच व्याजदर कमी करणार नाही, अशी भीती वाटत होती. उलट, गरज पडल्यास, व्याजदर दीर्घ कालावधीसाठी उच्च ठेवले जाऊ शकतात. या भीतीमुळे गुंतवणूकदारांची चिंता वाढली आणि विक्रीची लाट आली. या घसरणीचा सर्वाधिक फटका तंत्रज्ञान कंपन्यांच्या शेअर्सना बसला. नॅसडॅक कंपोझिट इंडेक्स जवळपास ४.२% ने घसरला. डाऊ जोन्स इंडस्ट्रियल व्हरेज १.४% ने खाली आला आणि एस अँड पी ५०० जवळपास ३% ने खाली आला. यावरून असे दिसून येते की विक्रीचा दबाव केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता; संपूर्ण अमेरिकन बाजारपेठ दबावाखाली होती.

## दहा लाख रुपयांच्या नकली नोटा जप्त

वाशिम : राजस्थानमधील आरोपीसह तिघांनी वाशिम बायपास आणि तोंडगाव टोलनाक्यावर ५०० रुपयांच्या नकली नोटा वापरण्याचा प्रयत्न केला. संशय आल्याने टोल कर्मचारी व पानटपरी चालकाने माहिती दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत एकाला अटक केली. आरोपींची स्कॉर्पिओ गाडीही जप्त करण्यात आली आहे.

## २५० वर्षांचा वटवृक्ष कोसळला!

बीड : तालुक्यातील बालाघाट परिसरात पूर्वी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावर वडाची भव्य झाडे दिसली की 'लिंबागणेश गाव आले' अशी ओळख होती. मात्र दोन-तीन दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसात लिंबागणेश बसस्थानकाजवळील सुमारे २५० वर्षे जुना महाकाय वटवृक्ष कोसळल्याने ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. मात्र, त्याच वडाच्या झाडाच्या फांद्या संपूर्ण गावात लावून वट वृक्षाचे गाव अशी ओळख गावाची निर्माण होईल यासाठी गावांनी निर्धार केला आहे आणि संपूर्ण गावात वटवृक्षाच्या फांद्या लावून वृक्षारोपण केलं.

## 'खोट्या गोष्टी पसरवण्याची पाकिस्तानला सवय'

### संयुक्त राष्ट्रात काश्मीर प्रश्नावर भारताची स्पष्ट भूमिका

वृत्तसंस्था

नवी दिल्ली :भारताने पाकिस्तानला संयुक्त राष्ट्रांमध्ये त्याची खरी जागा पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. जम्मू आणि काश्मीरवरील पाकिस्तानच्या अनावश्यक वक्तव्यांना 'खोटा वृत्तांत' संबोधून भारताने तीव्र आक्षेप घेतला. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या अधिवेशनादरम्यान, संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी पाकिस्तानला भारताच्या विरोधात खोटा आणि पक्षपाती अजेंडा राबवणे थांबवण्याचा स्पष्ट इशारा दिला.सुरक्षा परिषदेच्या वार्षिक अहवालावरील चर्चेदरम्यान पाकिस्तानचे स्थायी प्रतिनिधी असिम इफ्तिखार अहमद यांनी जम्मू आणि काश्मीरचा मुद्दा उपस्थित करण्यास सुरुवात केल्यावर या वादाला सुरुवात झाली. भारताने पाकिस्तानच्या अनावश्यक वक्तव्यांचा पर्दाफाश करून त्याला त्याची जागा दाखवून दिली.

भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी निःसंदिग्धपणे पुनरुच्चार केला की, जम्मू आणि काश्मीरशी संबंधित सर्व बाबी पूर्णपणे भारताच्या अंतर्गत बाबी आहेत. त्यांनी जागतिक स्तरावर सांगितले की, हा केंद्रशासित प्रदेश भारताचा अविभाज्य आणि अतूट भाग आहे आणि नेहमीच राहील. त्याविरुद्धचे कोणतेही दावे पूर्णपणे निराधार आणि ऐतिहासिक तथ्यांपासून विरहित आहेत. पी. हरीश म्हणाले की, पाकिस्तान कितीही पोकळ वक्तव्ये किंवा खोटे दावे करो, जमिनीवरील वास्तव कधीही बदलू शकत नाही. त्यांनी पाकिस्तानला आठवण करून दिली की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा सदस्य म्हणून त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे, पण ते आपल्या कृतींपासून मागे हटत नाहीये. जागतिक शांततेसाठी असलेल्या या प्रतिष्ठित मंचाचा पाकिस्तान सातत्याने गैरवापर करत असल्याबद्दल भारताने तीव्र चिंता आणि संताप व्यक्त केला. पी. हरीश म्हणाले की, पाकिस्तानने आपले संकुचित आणि विभाजनकारी राजकीय हितसंबंध साधण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या या प्रतिष्ठित व्यासपीठाचा गैरवापर केला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सुरक्षा परिषदेतील पाकिस्तानचा दोन वर्षांचा कार्यकाळ या वर्षी संपत आहे.

संयुक्त राष्ट्रांमध्ये पाकिस्तानला जबाबदार धरून, भारताने इस्लामाबादला आणखी एका आघाडीवर कोंडीत पकडले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने ७ जून रोजी गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये तथाकथित विधानसभेसाठी नियोजित सार्वत्रिक निवडणुकांवर पाकिस्तान सरकारकडे तीव्र निषेध नोंदवला आहे. भारताने स्पष्ट केले आहे की, हा संपूर्ण प्रदेश भारताचा भाग असून तो पाकिस्तानच्या बेकायदेशीर आणि बळजबरीच्या ताब्यात आहे.

## कॉकरोच जनता पार्टीचं पहिलं आंदोलन





वृत्तसंस्था

नवी दिल्ली: कॉकरोच जनता पार्टीनं जंतरमंतरवर आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनाला पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके उपस्थित होते. या आंदोलनाला हजारो तरुण उपस्थित होते. नीट पेपर लीक प्रकरणी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी दिली. यावेळी काही आंदोलकांनी झुरळ्यांचे फोटो असलेले टी शर्ट्स परिधान केले होते. तर काहींनी झुरळांचे फोटो असलेले मास्क घातले होते. आंदोलन सुरू असताना तिथे एक जण हातात हिट स्प्रे घेऊन पोहोचला. त्यामुळे आंदोलनस्थळी काही वेळ गोंधळ उडाला. आंदोलनस्थळी पोहोचलेल्या तरुणाच्या हातात एक फ्रेम होती. त्यात कॉकरोच जनता पार्टीचा लोगो होता. तरुणानं त्या फ्रेमवर हिट स्प्रे फवारुन सीजेपी आणि त्यांच्या समर्थकांवर निशाणा साधला. 'सोशल मीडियावरकॉकरोच जनता पार्टीचेकोट्यवधी पाठीराखे असल्याचं सांगितलं जातं. पण आंदोलनस्थळी अतिशय मोजके लोक दिसले. मग दोन कोटी फॉलोअर्स असल्याचा दाव्याचं नेमकं काय झालं,' असा खोचक सवाल त्यांनी विचारला. आमचं आंदोलन विद्यार्थी आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित असल्याचं सीजेपी समर्थकांनी म्हटलं. सरकार विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत असल्याचा आरोप त्यांनी केला.

शिक्षण व्यवस्थेशी संबंधित आमच्या मागण्या गांभीर्यानं ऐकून घ्यायला हव्यात, असा आग्रह आंदोलकांनी धरला. कॉकरोच जनता पार्टीच्या सदस्यांनी शनिवारी जंतरमंतरवर आंदोलन केलं. या पक्षाचं हे पहिलंच आंदोलन होतं. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी आंदोलनाचं नेतृत्व केलं. त्यासाठी ते आज अमेरिकेहून भारतात दाखल झाले होते. या दरम्यान दिल्लीत कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## सुविधा नसताना ठाण्यात 'डबल डेकर बस'चं लोकार्पण



तभा वृत्तसेवा

ठाणे : ठाण्यातील पहिल्या इलेक्ट्रिक डबल डेकर बसचे लोकार्पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी करण्यात आले. मात्र, तब्बल महिना उलटूनही ही डबल डेकर बस घोडबंदर रोड येथील आनंदनगर आगारात धूळखात पडून आहे. स्वतंत्र चार्जिंग स्टेशनच्या अभावामुळे ही बस नियमित सेवेत दाखल होण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

या पार्श्र्वभूमीवर ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी ठाणे परिवहन सेवेच्या वागळे आगाराला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी उपलब्ध जागेची पाहणी करून चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच चार्जिंग स्टेशन पूर्णत्वास येईपर्यंत पर्यायी चार्जिंग व्यवस्था उपलब्ध करून बस लवकरात लवकर प्रवासी सेवेत दाखल करण्यासाठी सर्व पर्यायांचा विचार करण्याबाबत महापौरांनी चर्चा केली.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत दाखल झालेल्या पहिल्या वातानुकूलित डबल डेकरई-बससहआगामी ई-बस आणि सीएनजी बस प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक पायाभूत सुविधांचा आढावा महापौर पिंपळोलकर यांनी वागळे येथील परिवहन आगारात घेतला.

यावेळी सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक अनिल भोर, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे तसेच परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र दिनी उपमुख्यमंत्री डॉ. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे परिवहन सेवेतील पहिल्या वातानुकूलित डबल डेकर ई-बसचे लोकार्पण करण्यात आले होते. या बसची प्रात्यक्षिक चाचणीही घेण्यात आली होती.

मात्र, नियमित सेवेसाठी आवश्यक असलेल्या स्वतंत्र चार्जिंग स्टेशनच्या अभावी ही बस सध्या आनंदनगर आगारात ठेवण्यात आली आहे. त्यामुळे बसच्या परिचालनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापौरांनी ही पाहणी केली.

## निदा खानची कबुली

नाशिक : देशभरात चर्चेत असलेल्या ढउड कंपनीतील धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणाला आता नवं वळण मिळाल्याचे पहायला मिळत आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिने कबुली दिली आहे. तिने धर्मांतर करण्यासाठी प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. निदा खान हिच्या जबाबासह काही गंभीर बाबी विशेष तपास पथकाने दाखल केलेल्या दोषारोपपत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्याची पहिली सुनावणी ९ जून रोजी होणार असल्याने प्रकरणाकडे लक्ष लागले आहे.

## पाटील यांच्या नावासाठी आग्रही

मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याबाबत राज्य सरकारचा आग्रह कायम असून, त्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले. नवी मुंबई विमानतळ परिसरात अवघ्या आठ महिन्यांच्या विक्रमी कालावधीत उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य आणि देखण्या अश्र्वारूढ पुतळ्याचे अनावरण शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते दिमाखात पार पडले. या ऐतिहासिक सोहळ्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विमानतळाच्या नामकरणावर सरकारची भूमिका अधोरेखित केली.

## कांदा उत्पादकांना मोठा दिलासा!



तभा वृत्तसेवा

नाशिक : मागील अनेक दिवसांपासून कमी दरामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी आलं होतं. योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता. मात्र आता कांदा उत्पादकांसाठी एक मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे.

या निर्णयासाठी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासन, नाफेड, छउउऋ आणि बाजार समिती प्रतिनिधींची महत्वपूर्ण बैठक पार पडली. कांदा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे कांद्याचे दर स्थिर राहण्यास आणि वाढीस मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दिलीप बनकर यांनी सांगितलं की, अनेकदा पाठपुरावा करूनही नाफेड आणि बाजारात येऊन खरेदी करत नव्हते. मात्र आता छगन भुजबळ आणि दादा भुसे यांच्या सूचनेनुसार काम सुरू झालं असून शासनाचे अधिकारीही प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

सोमवारपासून शेतकऱ्यांचा माल १,५८० रुपये दराने खरेदी केला जाणार असल्याने बाजारात स्पर्धा निर्माण होईल, असं त्यांनी म्हटलं.

तसंच नाफेड आणि छउउऋ मध्ये घोटाळा झाला असेल तर सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही दिलीप बनकर यांनी केली. दरम्यान, भाजप आमदार राहुल आहेर यांनीही या निर्णयाचं स्वागत केलं आहे. कांदा उत्पादकांना रास्त भाव मिळावा यासाठी बाजार समित्यांमध्येच खरेदी व्हावी, अशी मागणी होती. ती आता मान्य झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

सुरुवातीला फक्त - ग्रेड कांद्याची खरेदी होणार होती. मात्र आता णठड कांद्याचीही खरेदी होणार आहे. सरकारने ठरवून दिलेल्या दरानुसार खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले असून प्रत्येक बाजार समितीत तीन विभागांचे अधिकारी देखरेखीसाठी उपस्थित राहणार आहेत.

सध्या बाजारात १७०० ते १८०० रुपयांपर्यंत दर मिळत असले, तरी नाफेड आणि छउउऋ बाजारात आल्याने शेतकऱ्यांना अधिक दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच २ लाख टन खरेदी अपुरी असून ती १० लाख टनांपर्यंत वाढवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## युद्धनौका आमने सामने

वृत्तसंस्था

कोलंबो ::हिंदी महासागरात मोठी खलबतं घडत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. श्रीलंका आता जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे. भारताच्या शेजारील श्रीलंकेत एक दुर्मिळ आणि महत्त्वाची घटना घडली आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन प्रतिस्पर्धी देशांच्या नौदलाची जहाजे एकाच दिवशी श्रीलंकेच्या कोलंबो बंदरात आली आहेत.






## महाराष्ट्रात मान्सून धडकला, लवकरच मुंबईसह राज्यात



तभा वृत्तसेवा

मुंबई : अखेर महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर मान्सूनचे आगमन झाले आहे. भारतीय हवामान विभागाने शनिवारी मान्सूनने तळकोकणात प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा केली. गोवा पूर्णपणे व्यापल्यानंतर मोसमी वाऱ्यांनी दक्षिण कोकणात हजेरी लावली असून आता मुंबईसह राज्याच्या उर्वरित भागाकडे त्यांची वाटचाल सुरू झाली आहे. त्यामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

यंदा मान्सूनचे केरळमध्ये आगमन नेहमीपेक्षा तीन दिवस उशिराने झाले. ४ जून रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल झालेल्या मान्सूनने त्यानंतर वेग पकडला. अवघ्या दोन दिवसांत त्याने कर्नाटक, तामिळनाडू, गोवा आणि अरबी समुद्रातील आणखी काही भाग व्यापत महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत मजल मारली. हवामान विभागाच्या ताज्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल आहे.

मान्सून तळकोकणात दाखल झाल्यानंतर पुढील टप्पा मुंबई आणि उत्तर कोकणाचा असतो. अनेकदा दक्षिण कोकणात आगमन झाल्यानंतर मान्सून वेगाने पुढे सरकतो. त्यामुळे मुंबईतही लवकरच मान्सून दाखल होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. काही भागांत पावसाचा जोर वाढण्यासह वाऱ्याचा वेगही वाढू शकतो.

एप्रिल आणि मे महिन्यात राज्यातील अनेक भागांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागला. विशेषतः विदर्भात उष्णतेच्या लाटेसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अधूनमधून झालेल्या वादळी पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष मान्सूनकडेच लागले होते. आता अधिकृत प्रवेश झाल्याने खरीप हंगामाच्या तयारीलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे.

गेल्या वर्षी मान्सूनने २४ मे रोजी केरळमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तो तळकोकणात पोहोचला आणि २६ मे रोजी मुंबईत दाखल झाला होता. यंदा केरळमध्ये आगमन उशिरा झाले असले तरी पुढील प्रवास तुलनेने वेगाने होताना दिसत आहे. दरम्यान, जून महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता हवामान विभागाने यापूर्वी व्यक्त केली आहे. त्यामुळे मान्सूनची पुढील वाटचाल आणि आगामी पर्जन्यमान कसे राहणार, याकडे शेतकऱ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वाहन चोरी प्रकरणातील आरोपीस अटक

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत वाहन चोरीच्या दोन गुन्ह्यांतील आरोपीस अटक करून १ लाख २० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना कातपूर रोडवर एक संशयित इसम टाटा एसीई एक्सएल मालवाहू वाहनासह थांबलेला असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. तेथे एक इसम टाटा कंपनीचे मालवाहू वाहन (एमएच ०१ सीआर ७५८३) घेऊन संशयास्पदरीत्या उभा असल्याचे आढळून आले. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता अकबर सत्तार शेख (वय ३० रा. आष्टा, ता. चाकूर) असे नाव सांगितले.

सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये नंबर प्लेट नसलेली काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल आढळून आली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने संबंधित मोटारसायकल ही लातूर शहरातील संजयनगर परिसरातून तर टाटा एसीई एक्सएल मालवाहू वाहन हे किल्लारी परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या अभिलेखांची पडताळणी केली असता मोटारसायकल चोरीप्रकरणी पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गुन्हा दाखल असल्याचे तसेच मालवाहू वाहन चोरीप्रकरणी पोलीस ठाणे किल्लारी येथे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाईत हिरो स्प्लेंडर मोटारसायकल ४० हजार रूपये मालवाहू वाहन ८० हजार रूपये असा १ लाख २० हजार रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



## विविध वृत्त...

### लाच मागितली अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झालेल्याबाबत खुलासा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : परराज्यातील प्रवासी बसवर दंडात्मक कारवाई करताना परिवहन विभागाच्या पथकाने लाच मागितल्याची सोशल मीडिया आणि काही वृत्त माध्यमांमध्ये प्रसारित झालेली बातमी चुकीची, दिशाभूल करणारी असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. ४ जून २०२६ रोजी सकाळी ८:३९ वाजता परराज्यातील नोंदणी असलेल्या एआर-२०-डी-३७८६ या खासगी प्रवासी बसवर महाराष्ट्र राज्याचा परवाना नसणे, कर न भरणे आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करून ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. तपासणी दरम्यान पथकाने लाच मागितल्याचा दावा निराधार असून, संबंधित वाहनधारकाने दंडाची ही सर्व रक्कम ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे जमा केली आहे.

या वाहनावर यापूर्वीही ७ एप्रिल २०२६ रोजी ३ हजार ६५० रुपये, १३ मे २०२६ रोजी ३ हजार रुपये आणि १९ मे २०२६ रोजी ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता, जो वाहनधारकाने नियमानुसार ऑनलाईन भरला आहे. या प्रकरणाबाबत चुकीची माहिती पसरवून विभागाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित वाहन चालकावर लातूर (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागरिकांनी अशा अफवांवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# शहरातील वीज पुरवठा होतोय नेहमीच खंडीत

## आज महावितरण ग्राहकांचा विश्वास आणि अखंड वीजपुरवठा यावर चालते काय?

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. ६ जून : महावितरणची स्थापना२००५ रोजी झाली, त्यांची टॅग लाईन आहे अखंड सेवा, अटूट विश्र्वास, उज्ज्वल महाराष्ट्राच्या विकासाची प्रेरणा, सेवा, समर्पण आणि विश्र्वास तसेच ग्राहकांचा विश्र्वास, अखंड वीजपुरवठा या ओळी वाचल्या की महावितरण विषयी गर्व वाटणे स्वाभाविक आहे

परंतु गेल्या काही दिवसांपासून शहरातील विद्युत पुरवठा हंगामपूर्व दुरूस्तीच्या कामासाठी १ होत असल्याचे महावितरण कडून सांगितले जात आहे,

पावसाळ्यात वादळी वारे किंवा अन्य कारणाने विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून कोट्यवधी रुपये खर्च केले जात असतात, परंतु त्या तुलनेत ग्राहकांना सेवा मिळत नाही, सध्य स्थितीत झाडांच्या फांद्या छाटणे, इन्सुलेटर बदलणे, डीपी ऑईल बदलणे आदी कामे रखडलेलीच आहेत,

आपण फक्त गांधी चौकाचा विचार केला तर, या परिसरात बहुतेक वर्तमान पत्रांची कार्यालये आहेत, त्यामुळे या ल यांना वीज नियमित हवी असते, त्याशिवाय त्यांची दैनंदिन कामे होत नाहीत, त्यातल्या त्यात सायंकाळी सहा ते आठ नऊ या काळात त्यांची पानं तयार होत असतात, काहींना हेड ऑफिसला तयार पानं पाठवयाची असतात आणि नेमकी याच वेळी वीज गायब असते, फोन केला की, वरून लाईट गेली असल्याचे ओघम उत्तर मिळते, अशावेळी लाईट आल्याशिवाय कामचं होत नाहीत, अशा हेड कार्यालयापर्यत एकच कल्लोळ उठत असतो, चुक नसताना टार्गेटवर यावे लागते

मग अशावेळी ग्राहकांचा विश्र्वास आणि अखंड वीजपुरवठा याचे महावितरणला विसर पडतो की काय ?

महावितरणने किमान सायंकाळी सहा ते रात्री नऊपर्यंत वीजपुरवठा कसा सुरळीत ठेवता येईल याकडे गांर्भि याने बघणे आवश्यक आहे तसेच इतर कामे करताना ज्या भागात दुरुस्ती किंवा इतर कामांसाठी वीजपुरवठा खंडीत होणार आहे अशा भागांना महावितरणने आगाऊ सूचना द्यावी,

परंतु गांधी चौक परिसरात काही दुरुस्ती किंवा इतर कामे असतील तर कृपया त्यांनी सकाळी१२ पर्यंत करावीत जेणेकरून वर्तमान पत्र वाल्यांचा खेळखंडोबा होणार नाही आणि ग्राहकांचा विश्र्वास आणि अखंड वीजपुरवठा खरोखरीच साध्य केल्या सारखे होईल हे झाले सायंकाळचे चित्र पण रात्री दहा ते अकरा कधीकधी मध्यरात्री, जनता गाढ झोपेत असताना किंवा पहाटे साखर झोपेत असताना ही वीज गुल होत असते, अशावेळी वीज पुरवठा का खंडीत होतो हा संशोधनाचा विषय होऊ शकतो, यावेळी बरेच ग्राहक महावितरणला फोन करतात त्यावेळी फोन व्यस्त असतो मग शंका येणे स्वाभाविक असते की फोन खराच व्यस्त आहे की केला गेला आहे

ग्राहक नियमित बील भरत असतात, रिडींग न घेताच बिलं देत असल्याचे उघड झाले असून ग्राहकांना अवरेज बिलं दिली जातात, काहीना बिल भरूनही पुढच्या बिलात बाकी दिसून येते, अशावेळी महावितरणचे कार्यालय गाठावे लागतेच, मग बील कमी करून भरावे लागते, अशावेळी त्या ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागतो.

मुळात वीजबिल लवकर मिळाले तर ते वेळेतच भरले जाते परंतु वीज बिलं ग्राहकांपर्यंत वेळेवर येतच नाहीत याचे मुख्य कारण आहे ते म्हणजे बिलं परस्पर दुसऱ्याच व्यक्तीकडे दिली जात असल्याचे आहे . ज्यांच्याकडे बिल दिली जातात तो त्याच्या सोईनुसार बिल ग्राहकांना देत असतो, त्यामुळे संबंधितानी ज्यांची बिलं त्यांनाच दिली पाहिजेत.

महावितरण ने खरेच प्रामाणिकपणे कामं करावीत आणि आपल्या ग्राहकांचा विश्र्वास आणि अखंडीत वीजपुरवठा या वाक्याची सार्थकता जपावी, म्हणजे खऱ्या अर्थानी ग्राहकांना सुद्धा महावितरण विषयी सार्थ अभिमान वाटेल

### मनपा कर्मचाऱ्यांच्या ७ व्या वेतनाची थकबाकी द्या



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : लातूर शहर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या ७ व्या वेतनाची थकबाकी तत्काळ देण्यात यावी, या मागणीचे निवेदन दि. ४ जून रोजी महाराष्ट्र मुस्लिम मेहत्तर सफाई कामगार संघटनेच्या वतीने महापालिका आयुक्तांना देण्यात आले.

मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या ७ व्या वेतनाची थकबाकी दि. १ जानेवारी २०१६ पासून प्रलंबीत आहे. याबाबत महापालिका प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देऊनही त्याची दखल घेतली जात नाही. महापौर आणि आयुक्तांनी ही बाबत गांभीर्याने घेत येत्या १५ दिवसांत टप्प्याटप्प्याने ७ व्या वेतनाची थकबाकी द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र मुस्लिम मेहत्तर सफाई कामगार संघटनेचे अध्यक्ष सज्जाद शेख यांच्या नेतृत्वाखाली आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

### रेणापूर तहसीलदारांकडून भूकंपग्रस्ताची हेळसांड

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : सन १९९३ साली लातूर जिल्ह्यात प्रलयकारी भुकपं झाला होता. त्यानंतर शासनाने भूकंपग्रस्ताना भूकंपग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र देऊन त्यांच्या वारसाना शासकीय नोकरीत सवलत देण्याचे आदेशीत केले होते. मात्र रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात यांनी भूकंपग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी नियमात नसलेल्या अटी टाकून भूकंपग्रस्ताना प्रमाणपत्रापासून वंचित ठेवले आहे.

न्यायालयाच्या आदेशाला देखील कराची टोपली दाखवल्यामुळे संतप्त झालेल्या भूकं पग्रस्त तरुणाने थेट जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मैदानात झाडाखाली बसून ठिय्या सुरु केलाय.

जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत जाणार नसल्याचा पवित्रा तरुणाने घेतला असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनदेखील दिले आहे.

## लातूर वृक्ष चळवळीला चिमुकल्यांनी दिला नवांकुर !



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : लातूर शहर महानगरपालिकेसह ५२ संस्थानी एकत्र येऊन लातूर वृक्ष चळवळ उभी केली, या चळवळीने लातूर शहरात २०१६ साली १० हजार झाडे लावली त्या झाडांचा १० वा वाढदिवस साजरा करण्यात आला आणि 'निसर्ग वाचला तरच आपण वाचू', असा संदेश दिला.

लातूर वृक्ष, स्टीम एज्युकेशन, सह्याद्री देवराई, माझं घर या संस्थाच्या वतीने औसा रोडवरील स्टीम एज्यूकेशन संस्थेच्या आवारात ५ जून रोजी चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून, आदर्श कॉलनीपर्यंत वृक्षदिंडी काढून, तसेच माझं घरच्या विद्यार्थ्यांनी प्रदूषण विरोधी संदेश देत बुधोडा ते लातूर सायकल रॅली काढून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या बोबड्या भाषेत झाडांचे महत्व सांगून लातूर वृक्ष चळवळ व सह्याद्री देवराईच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रमांनी दिवसभर वातावरण निर्मिती केली. सकाळी स्टीम एज्युकेशन, पाटील प्लाझा जवळ, औसा रोड येथे शालेय मुलांच्या उपस्थितीत १० हजार झाडांचा वाढदिवस साजरा झाला. त्यानंतर आदर्श कॉलनी ते स्टीम एज्युकेशनपर्यंत लहान मुलांची वृक्ष-पर्यावरण दिंडी काढण्यात आली. 'माझं घर' प्रकल्पातील मुलं बुधोड्याहून सायकल रॅली काढत लातूरमध्ये दाखल झाली. शेकडो महिला भगिनींच्या सहभागाने औसा रोडवरील स्टीम एज्युकेशनच्या पाठीमागील ग्रीन बेल्टमध्ये ऑक्सिजन झोन निर्मितीचा शुभारंभकरण्यात आला. ताम्हण, वड, पिंपळ, कडुलिंब अशा स्थानिक २५ झाडांचे प्रतिनिधिक वृक्षारोपण झाले.

प्रास्ताविक लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी केले. यावेळी नगरसेविका स्वाती घोरपडे, डॉ. नीलम पन्हाळे, स्टीम एज्युकेशनचे ओमप्रकाश झुरळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बी. आर. पाटील, श्रीकांत करवा, शरद झरे, ॲड. बालाजी इंगळे, लातूर मनपाचे उद्यान विभाग प्रमुख समाधान सूर्यवंशी, कलीम शेख, अमृत सोनवणे, रितेश चापसी, नेताजी जाधव, धवल मशरू, महेश बिडवे, कल्पना झुरळे, मुख्याध्यापिका अंजू व्यास, उमा माने, गौरी देशमुख, प्रियांका झेरिकुंटे, अक्षय पंचाक्षरी यांच्यासह लातूर वृक्ष चळवळ, सह्याद्री देवराई, स्टीम एज्युकेशन, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, सह्याद्री देवराई हासेगाव, माझं घर बुधोडा व लातूर शहर महानगरपालिकेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पिंपळगाव अंबा येथे अखंड हरिनाम सप्ताह



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : लातूर तालुक्यातील पिंपळगाव अंबा येथे दि. ५ ते १२ जून या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळा व श्रीमद भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ६ ते ६.३० श्री स अभिषेक व विष्णू सहस्त्रनाम, ६.३० ते १० ज्ञानेश्र्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन, दुपारी २ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन, रात्री ११ ते २ जागर असे कार्यक्रम पार पडणार आहेत. शुक्रवार दि. ५ जून रोजी हभप गोपिनाथ महाराज शास्त्री यांचे किर्तन झाले. शनिवार दि. ६ जून रोजी हभप पांडूरंग महाराज शिंपले, रविवार दि. ७ जून रोजी हभप गहीनीनाथ गोमदे महाराज, सोमवार दि. ८ जून रोजी हभप मुक्ताताई दळवी महाराज, मंगळवार दि. ९ जून रोजी हभप राम महाराज, बुधवार दि. १० जून रोजी हभप निर्गुनाताई धायगुडे महाराज, गुरूवार दि. ११ जून रोजी हभप आशाताई राऊत महाराज, शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप दत्ता महाराज फुलारी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सेवेचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रारूप विकास आराखड्याबाबत सूचनांचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ जून : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने लातूर शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. या संदर्भात नागरिकांच्या काही अपेक्षा व सूचना असतील तर त्या कळविण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

या आराखड्याबाबत शहर व परिसरातील मनपाच्या सर्वसाधारण सभेने २०२३ मध्ये प्रारूप विकास योजना तयार करण्यास मान्यता दिलेली आहे. ही योजना तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

स्थानिक नागरिक, व्यावसायिक, मालमत्ताधारक, विकसक व काही विभागांना सूचना करावयाच्या असतील तर त्यांच्यासाठी ही संधी आहे. शहराची खरीखुरी गरज काय आहे? हे या माध्यमातून कळू शकते. अशी माहिती संकलित करणे, सार्वजनिक कारणांसाठी लागणारी नवीन आरक्षणे, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्मशानभूमी, दुकाने, नवीन रस्ते व भविष्यातील अपेक्षित सोयी-सुविधा या संदर्भातील प्रश्र्नावली दि. ८ जून रोजी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांनी या संदर्भातील आपले मत व सूचना लेखी प्रश्र्नावली मध्ये भरून नगर रचना विभाग येथे दि. ९ व १० जूनपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये दाखल करावयाच्या आहेत. या सूचनामुळे प्रारूप विकास आराखडा सर्वसमावेशक व लोकाभिमुख पद्धतीने तयार करता येणार आहे.

नागरिकांनी आपल्या सूचना कळवाव्यात, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपाचे मनपा इमारतीत कुत्रे आणून आंदोलन

लातूर दि. ६ जून : निवडणूक काळात मोठ मोठी आश्र्वासने देवून लातूरकरांची दिशाभूल करून मनपात सत्तेत आलेल्या काँग्रेसने लातूरकरांना वाऱ्यावर सोडलेले पाहण्यास मिळत आहे. सत्ता प्राप्त होऊन १४१ दिवस लोटले असले तरी प्रश्र्न मात्र कायम असल्याचे सांगून या काळात स्थानिक सत्ताधारी व अधिकार्यांच्या निष्क्रयतेमुळे तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. शहरातील मोकाट कुत्र्याने एकाचा तर खड्ड्याने दोन चिमुकल्यांना मृत्यूला सामोरे जावे लागले होते. याबाबत सत्ताधारी व अधिकार्यांकडून कोणतीच ठोस कारवाई न झाल्यामुळे शहर जिल्हा भाजपा हे आंदोलन केवळ इशारा देण्यासाठी केले असून आगामी काळात यापेक्षा तिव्र आंदोलन करत शहरातील मोकाट कुत्रे सत्ताधारी व अधिकार्यांच्या घरात सोडण्यात येतील, असा इशारा भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिला आहे.

शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा या मागणीसाठी भाजपाच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या मार्गदर्शनात तर विरोधी पक्षनेते देविदास काळे व गटनेते ॲड. दिपक मठपती यांच्या नेतृत्वात मनपा आवारात मोकाट कुत्रे आणून आंदोलन केले. या आंदोलनावेळी अजित पाटील कव्हेकर बोलत होते.

मनपातील सत्ताधारी व निष्क्रीय अधिकार्यांवर टीका करत हा इशारा देत अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, लातूरचे आमदार म्हणून मिरवणारे अमित देशमुख यांनी मनपा निवडणुकीच्या काळात आश्र्वासनांचा पाऊस पाडत लातूरकरांची दिशाभूल करून मनपात सत्ता प्राप्त केली. मनपात काँग्रेसला सत्तेत येवून १४१ दिवस लोटले असले तरी अद्यापपर्यंत एकाही आश्र्वासनांची पूर्तता त्यांच्याकडून झालेली नाही. याउलट विकासकामात खोडा घालत लातूरकरांना वेठीस धरण्याचे काम सत्ताधारी काँग्रेसकडून झाले आहे. लातूरमधील अनेक प्रश्र्न अधिक जटील झालेले असून ते सोडविण्यात सत्ताधारी अपयशी ठरलेले आहेत. किंबहूना त्यांना हे प्रश्र्न सोडविण्यासाठी वेळ नसून केवळ आपले खिसे भरण्यात ते मग्न असल्याचे सांगितले. सत्ताधार्यांचा प्रशासनावर अंकुश नसल्यामुळे अधिकारीही असेंदनशिल झाले असून त्यांच्याकडूनही नागरिकांना सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्यांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी कागदी घोडे नाचविले जात असल्याचा आरोप अजित पाटील यांनी केला. सत्ताधारी आणि अधिकार्यांच्या या अकार्यक्षमतेमुळे मागील काही दिवसांत लातूरमधील तीन निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून आगामी काळात नागरिकांचे प्रश्र्न मार्गी न लावल्यास आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न झाल्यास हेच मोकाट कुत्रे सत्ताधारी व अधिकार्यांच्या घरात सोडण्यात येतील, असा इशारा शहर जिल्हाध्यक्ष कव्हेकर यांनी दिला.




विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी सत्ताधारी व अधिकार्यांच्या कारभाराचा पंचनामा करत या दोघांची मिलीभगत असल्याचा आरोप करत यामुळे लातूरकरांना वेठीस धरले जावू लागले आहे. सर्वसाधारण सभेत भाजपाच्या नगरसेवकांनी मोकाट कुत्र्यांचा प्रश्र्न उपस्थित केला असता याबाबत कोणतेच गांभीर्य न दाखवता सत्ताधारी व अधिकारी यांनी या विषयाकडे कानाडोळा केला. त्याच वेळी याबाबत कारवाई झाली असती तर एका निष्पाप जिवाचा बळी गेला नसता, असेही देविदास काळे म्हणाले. मोकाट कुत्र्यांमुळे ज्या युवकाचा बळी गेला आहे त्याच्या परिवारालाही मनपाचे सत्ताधारी व प्रशासनाकडून कोणताच दिलासा मिळाला नाही. विशेष म्हणजे प्रशासनाने या विषयी चौकशी समिती गठीत करून दोषींवर कारवाई करण्याचा शब्द दिला होता. सत्ताधार्यांना लातूरकरांशी काही देणेघेणे नसल्याने प्रशासनातील अधिकारीही लातूरकरांना वेड्यात काढण्याचे काम करत असल्याचे सांगून आगामी काळात यापेक्षा अधिक तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देविदास काळे यांनी दिला आहे.

याप्रसंगी गटनेते ॲड. दिपक मठपती, नगरसेवक रविशंकर जाधव, गिरीष पाटील,गणेश गवारे, शोभा पाटील, शितल मालू, स्वाती घोरपडे आदींनी मनपातील सत्ताधारी व अधिकारी यांच्यावर टीकेची झोड उठवली. या आंदोलनात सरचिटणीस संजय गीर, नगरसेवक उध्दव तेलंगे, भीमाशंकर बेंबळकर, संगीता मिरचे, ऋषिकेश राजे, मंडलाध्यक्ष सुरेश जाधव, चंद्रकांत साळुंके, राहूल भुतडा, रोहीत पाटील,दत्ता चेवले, पवन आल्टे, प्रमोद गुडे, पुनित पाटील, आदींसह नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर आंदोलनाची सुरुवात महात्मा गांधी चौक येथून करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त...

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठात वृक्षारोपण : सामाजिक वनीकरण विभाग व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग परभणी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या 'सेंद्रिय व नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, सायाळा ब्लॉक' येथे हा पर्यावरणपूरक उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून परभणीचे पोलीस अधीक्षक पंकज कुमावत उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन आणि हरित परभणीचा संदेश देण्यात आला. यावेळी संशोधन संचालक डॉ. बेग, सामाजिक वनीकरण विभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक सायमा पठाण, वनपरिक्षेत्र अधिकारी भूषण गजपुरे तसेच विद्यापीठाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व अधिकारी डॉ. आसेवार, डॉ. काळपांडे, डॉ. खर्गखराटे, डॉ. खंदारे आणि डॉ. आनंद गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपाल अर्चना चंद्रमोरे, छाया गोरे तसेच वनरक्षक जी. डी. सावंत, एन. एस. शेख, निलोफर मॅडम आणि विद्यापीठ व वनीकरण विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनरक्षक एम. बी. कुंभकर्ण यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुरू करण्यात आलेली वृक्षलागवड मोहीम आगामी काळातही सातत्याने आणि प्रभावीपणे राबविण्यात येईल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

### जिल्हाधिकारी सायकलवरून आले कार्यालयात दिला पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीचा संदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी आज स्वतः सायकलवरून कार्यालयात येत पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. त्यांच्या या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि इंधन बचतीचा प्रभावी संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचला.

वाढते प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि बदलते हवामान या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शक्य तिथे सायकलचा वापर केल्यास इंधन बचतीसोबतच आरोग्य संवर्धनालाही मोठा फायदा होतो, असेही त्यांनी नमूद केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी केले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

### कर्मचाऱ्यांच्या अडचणी वेळेत सोडवाव्यात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**परभणी,/प्रतिनिधी-** शासन सेवेतील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध




प्रलंबित अडचणी वेळेत व संवेदनशीलतेने सोडविल्यास प्रशासन अधिक कार्यक्षम बनेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या निर्देशानुसार विभागातील सर्व जिल्हा व तालुका मुख्यालय स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी आयोजित करण्यात येणाऱ्या कर्मचारी समाधान शिबिराअंतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण हे होते.

यावेळी निवासी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण, तहसीलदार रामदास कोलगणे तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, शासकीय कर्मचारी हे प्रशासनाचा महत्त्वाचा कणा आहेत. कर्मचारी मानसिकदृष्ट्या समाधानी व तणावरहित असतील तर ते अधिक कार्यतत्परतेने काम करून नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने व जलदगतीने सोडवू शकतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, पदोन्नती, बदली, सेवापुस्तिका अद्यावतीकरण, रजा रोखीकरण, पेन्शन, सेवानिवृत्ती उपदान आदी सेवाविषयक अडचणी प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे.

सेवापुस्तिका वेळेत अद्यावत करणे तसेच सेवानिवृत्तीपूर्व सहा महिने अगोदर पेन्शन प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे सांगत त्यांनी संबंधित विभागांना दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

# पिकांना वेळेवर पाणी मिळत नसेल, तर शेतकरी जगणार कसा?

## आ.डॉ.गुट्टेंचा महावितरण अधिकाऱ्यांना भावनिक सवाल

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण शेतकऱ्यांना महावितरणकडून योग्य पध्दतीने वीजपुरवठा होत नाही. तरीही रात्री-अपरात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी बांधव शेतात जातात, मात्र वीज गायब होते. त्यामुळे उभे पीक करपून जाते आणि महिनोंची मेहनत वाया जाते. या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार? शिवाय, जर त्याच शेतकऱ्याच्या पिकांना वेळेवर पाणी मिळत नसेल, तर तो जगणार तरी कसा? असा संतप्त सवाल स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी महावितणच्या अधिकाऱ्यांना विचारला. तसेच सातत्यपूर्ण आणि नियोजित वीजपुरवठ्याशिवाय शेती करणे आता अशक्य झाले असून, यावर तातडीने मार्ग काढणे गरजेचे असल्याचे ठणकावून सांगितले.

तालुक्यातील मौजे.बनपिपळा येथे आ.डॉ. गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत महावितरण अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी तालुक्यातील वीजपुरवठा संदर्भात सद्यस्थिती व अडचणी समजून घेतल्या. तसेच शहर व ग्रामीण भागातील वीजपुरवठा संदर्भात होत असलेली अनियमितता आणि त्यातून निर्माण झालेल्या विविध समस्या निर्देशनास आणून दिल्या. शिवाय, ग्रामीण भागातील गावठाण फीडर व कृषीपंप वीजपुरवठा यातील असमतोल, वारंवार होणारे लोडशेडिंग, तसेच सायंकाळी होणाऱ्या फोर्स लोडशेडिंगमुळे निर्माण होणाऱ्या विविध अडचणींवर सविस्तर चर्चा केली.

लोडशेडिंग हा शब्द आता तांत्रिक संज्ञा राहिलेला नाही, तर तो शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू आणि गृहिणीच्या कपाळावरचा घाम बनला आहे. त्यामुळे आम्ही प्रयत्न करतो आहोत या पोकळ आश्वासनांनी आता पोट भरत नाही. कारण, वीजपुरवठा हा नागरिकांसाठी जगण्याचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर जळाला, डीपी नादुरुस्त झाली, केबल तुटली, ही कारणे ऐकून घेण्याच्या पलीकडे जनता आता गेली आहे. कारण शेतात उभे पीक वाळताना पाहणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. त्यामुळे आपली कार्यपध्दती बदला आणि तातडीने उपाययोजना करा, असेही आवाहन आ.डॉ. गुट्टे यांनी आवर्जून केले.


मनुष्यबळ कमी आहे, निधी नाही, साहित्य नाही, ही कारणे दरवेळी ऐकून घेतली जाणार नाहीत. तरीही ही समस्या सोडवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर तुम्ही काय प्रस्ताव पाठवला, त्याचा पाठपुरावा किती वेळा केला, हेही स्पष्ट करा. कारण



तुमची खुर्ची ही एसी केबिनमध्ये बसण्यासाठी नाही, तर फिल्डवर उतरून जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आहे. त्यामुळे प्रत्येक फ्यूज कॉल सेंटरला आलेल्या तक्रारीचा निपटारा २४ तासांच्या आत झाला पाहिजे, आणि त्याची अंमलबजावणी होते की नाही, याचा आढावा पुढच्या बैठकीत घेतला जाईल, असाही इशारा आ.डॉ.गुट्टे यांनी दिला. दरम्यान शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू असलेले दीर्घकाळचे वीज भारनियमन ही केवळ तांत्रिक अडचण राहिलेली नाही, तर ती आता सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि शेती व्यवसायावर गंभीर परिणाम करणारी समस्या बनली आहे. रोजच्या अतिरिक्त भारनियमनामुळे शेतकरी आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत वीज खंडित होत असल्याने जनावरांची देखभाल, दूध काढणे, घरातील स्वच्छता आणि स्वयंपाक या सर्वच गोष्टी विस्कळीत होत असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून नमूद केले. या बैठकीस महावितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांच्यासह गुट्टे काका मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधान परिषद निवडणूकीत तीन उमेदवार निवडणूक रिंगणात

**परभणी,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुक-२०२६ साठी एकूण ३ उमेदवार निवडणूक लढविणार आहेत. तर ४ उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.




निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नाव व पक्ष पुढील प्रमाणे आहेत. विवेक पांडुरंग नावंदर, पक्ष-शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), सईद खान शेरगुल खान, पक्ष शिवसेना आणि सुशिलकुमार सुरेशराव देशमुख (अपक्ष). उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्या उमेदवारांचे नावे पुढील प्रमाणे आहेत. संग्राम प्रतापराव जामकर, बुधवंत विश्वजित मनोहर, मेहराज खान शेरगुल खान पठाण आणि विजय रावसाहेब जामकर. सर्व उमेदवार अपक्ष आहेत.

## पंचायत समिती जिंतूर येथे सभापती आयोध्याताई खिस्ते यांच्या हस्ते शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**जिंतूर,/प्रतिनिधी-** पंचायत समिती जिंतूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी सभापती सौ. आयोध्या ताई किशोर खिस्ते यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून नंतरयांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



या प्रसंगी उपसभापती श्री माधव दराडे, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर श्री कैलास खंदारे, गटविकास अधिकारी श्री सुभाष मानकर साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री पोले साहेब, उपअभियंता श्री कैलास देशमुख साहेब, विस्तार अधिकारी श्री भोसले साहेब, श्री कुरेशी साहेब, श्री के शी घुगेशिवरामढोणे साहेब, श्री कुटे साहेब, श्री नामदेवपोटे साहेब तसेच पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येनेउपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम, स्वराज्य स्थापनेच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या विचारांचा आदर्श समाजात रुजविण्याचा संकल्प व्यक्त केला यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय भवानी जय शिवाजी जय च्याघोषणाने पंचायत समिती दुमदुमली होती

## भाजपाची जिल्हास्तरीय बैठक; विश्वास, विकास आणि जनकल्याण अभियानाच्या नियोजनावर चर्चा

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतीय जनता पार्टी महानगर व ग्रामीणच्या वतीने शहरातील सिटी पॅलेस येथे मोदी सरकारची १२ वर्षे : विश्वास, विकास आणि जनकल्याण या अभियानांतर्गत जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत आगामी विविध कार्यक्रमांचे नियोजन, जनसंपर्क अभियान आणि संघटनात्मक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, मराठवाडा संयोजक नितीन काळे आणि युवा नेते राहुल लोणीकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, गटनेते मुकिंद खिल्लारे,



माजी जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, नगरसेवक डॉ. केदार खटिंग यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी डॉ. भागवत कराड, नितीन काळे आणि राहुल लोणीकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध विकासकामे आणि जनकल्याणकारी योजनांची माहिती दिली. तसेच ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन, २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन आणि २५ जून रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या 'आपत्काल के ५१ साल' या कार्यक्रमांच्या आयोजनाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. विकसित भारत संकल्प संमेलन, विशेष जनसंपर्क अभियान, प्रगती पथ यात्रा, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान तसेच पत्रकार परिषद यांसारखे विविध कार्यक्रम जिल्हाभरात आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. भागवत कराड यांनी केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विकास प्रकल्प, विविध कल्याणकारी योजना आणि आगामी कार्यक्रमांची माहिती पत्रकारांना दिली. या बैठकीस भाजपा महानगर व ग्रामीण संघटनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गोदावरीची स्वच्छता युथ फॉर गोदावरी व ग्रीन इंडीया चॅलेंजचा उपक्रम



**परभणी,/प्रतिनिधी-** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त युथ फॉर गोदावरी व ग्रीन इंडिया चॅलेंज यांच्या वतीने शुक्रवार दि.५ जुन रोजी सोनपेठ तालुक्यातील श्री क्षेत्र वाणी संगम येथे गोदावरी स्वच्छता व देशी वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात युथ फॉर गोदावरी चे मुख्य समन्वयक सुधीर बिंदू, आदिती बिंदू,श्रुती आचार्य,संगीता सलगर, रत्नमाला शिंदे, द्रुपदबाई मोरे, इंदुबाई चौधरी, भाग्यश्री बर्वे, गवळनबाई गांगर्डे, पोलीस पाटील शेषराव चव्हाण, रुपेश राठोड, सोमनाथ नागुरे यांनी सहभाग नोंदवला.

अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी गोदावरी नदीपात्र व परिसरातील प्लास्टिक, कचरा, टाकुन दिलेले कपडे आणि इतर घातक वस्तूंचे संकलन करून परिसर स्वच्छ केला. यामुळे नदी परिसर अधिक स्वच्छ व सुंदर करण्यास मदत झाली. यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. यावेळी आयोजकांनी गोदावरी नदीचे धार्मिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित करत नदी स्वच्छता आणि वृक्षसंवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. युवकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह लाभला. युथ फॉर गोदावरी या उपक्रमा अंतर्गत गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या गावातील युवकांना गोदावरी नदीचे धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक व सांस्कृतिक तसेच पर्यावरणीय महत्व पटवुन नदीच्या संरक्षणासाठी सज्ज करण्यात येणार आहे. तसेच ग्रीन इंडीया चॅलेंज च्या वतीने गोदावरी नदीच्या काठावर देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे अशी माहिती युथ फॉर गोदावरी चे मुख्य संयोजक सुधीर बिंदू यांनी सांगितले.

# पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिंतूर शहर भाजपातर्फे क्रीडा संकुलात १०१ वृक्षांचे रोपण

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केलेल्या वृक्षारोपणाच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारतीय जनता पक्षाच्या जिंतूर शहर मंडळाच्या वतीने क्रीडा संकुल परिसरात १०१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. वृक्षारोपणानंतर लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, गटनेते सचिन गोरे, उपाध्यक्ष मोहसीन खान, नगरसेवक किशोर जाधव व असेफ खान, मंडळाध्यक्ष विलास भंडारे, उपक्रमाचे संयोजक समीर जानीमियाँ, किसान मोर्चा मंडळाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, बंटी जाधव, विजय जाधव, राजेश राठोड, शाहरुख सर, ताठे, सय्यद नसीर, रमेश संगेकर, अनिल मेटागळे, जोशी सर तसेच विद्यार्थी व भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाणार असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

छायाचित्र ओळ : जिंतूर येथील क्रीडा संकुल परिसरात भाजप शहर मंडळाच्या वतीने आयोजित वृक्षारोपण उपक्रमात सहभागी झालेले पदाधिकारी व कार्यकर्ते.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विधान परिषद निवडणुकीचे कवित्व

आपल्या देशात दोन पद्धतीने निवडणुका होतात. एक म्हणजे प्रत्यक्ष निवडणूक आणि दुसरी म्हणजे अप्रत्यक्ष निवडणूक. लोकसभा आणि विधानसभेसाठी होते, ती प्रत्यक्ष निवडणूक आणि विधानपरिषद आणि राज्यसभेसाठी होते, ती अप्रत्यक्ष निवडणूक. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि नगरपालिका- महानगर पालिकेसाठीही प्रत्यक्ष निवडणूक होते. प्रत्यक्ष निवडणुकीत सर्वसामान्य जनता मतदान करून आपले लोकप्रतिनिधी निवडते. विधान परिषद आणि राज्यसभा निवडणुकीत जनता थेट मतदान करत नाही, तर जनतेने आधीच्या निवडणुकीत म्हणजे विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मतदान करीत असतात. विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघात शिक्षक तर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पदवीधर मंडळी मतदान करीत असतात. विधानसभा निवडणुकीत एक लाखापासून पाच लाखांपर्यंत मतदार असतात तर लोकसभा निवडणुकीत मतदारांचा संख्या २५ ते ३० लाखांपर्यंत असते. त्यामुळे या निवडणुका नेहमीच चुरशीच्या होतात. विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीत मतदारांची संख्या मर्यादित असते. तरीही त्यांत चुरस असतेच. कोणत्या पक्षाचे किती मतदार आहेत, हे ठरलेले असते. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाची सगळ्यांना आधीच कल्पना आलेली असते. सामान्यपणे निवडणूक विधान परिषदेची असो की राज्यसभेची; ती अनेकदा अविरोध होते. फार कमी वेळा त्यात निवडणुकीची म्हणजे मतदानाची वेळ येते. निवडणूक विधानसभेची असो की लोकसभेची, त्यात पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागतो, हे आता लपून राहिलेले नाही. पूर्वीच्या काळी विधान परिषद वा राज्यसभेच्या निवडणुकीला फार खर्च लागत नसे. कारण अशा निवडणुकीचा प्रचार करण्याची गरजच पडत नव्हती. पक्षाचे मतदार व पक्षांचे अंतर्गत सामंजस्य यावर निकाल ठरायचे. आता ती स्थिती राहिलेली नाही हे खरेच. पण, हे राजकारण आहे. राजकारणात सारे काही क्षम्य असते असे म्हणतात. क्रिकेटच्या मैदानात बॅडमिंटनची रॅकेट घेऊन खेळता येत नाही. निवडणूक हे मैदान असते. जो सर्वप्रकारच्या तयारीत असतो, त्याचाच विजय होतो. महाराष्ट्रात विधान परिषदेच्या १७ तर राज्यसभेच्या एका जागेसाठी सध्या निवडणूक होत आहे. विधान परिषदेच्या १७ पैकी ६ जागांवरील उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ११ जागांसाठी १८ जूनला मतदान होणार आहे. फक्त भाजपाचेच उमेदवार अविरोध विजयी झाले असे नव्हे, तर शिवसेना शिंदे गटाचे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवारही अविरोध विजयी झाले आहेत. अविरोध विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये भाजपाचे अरुण लखानी, प्राजक्त तनपुरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अनिकेत तटकरे, विक्रम काकडे तसेच शिवसेना शिंदे गटाचे दुष्यंत चतुर्वेदी आणि रवींद्र फाटक यांचा समावेश आहे. याचा अर्थ महाराष्ट्राच्या महायुतीतील तिन्ही पक्षांचे प्रत्येकी दोन उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. निवडणुकीत असे घडताच असते. मुद्दा असतो कोण किती तयारीचा आहे याचा आणि पक्ष त्या उमेदवाराच्या पाठीशी किती ताकदीने उभा आहे याचा. भाजपा आपल्या उमेदवारांची काळजी अतिशय निगुतीने घेते. अर्ज भरण्याच्या तयारीपासून ते मतदारांना याद्यांची छाननी करण्यापर्यंत सारे काही पक्ष करीत असतो. दुसऱ्या बाजूला गब्बर नेत्यांची मांदियाळी असलेला काँग्रेस पक्ष प्रचारासाठी साधे झेंडे पाठवू शकत नाही, हे वारंवार दिसले. अशा पक्षाचा विजय कसा होणार? त्या तुलनेत भाजपा आपल्या माणसांना उमेदवार म्हणून जे काही पाठबळ द्यायचे, ते देते. राजकारणात गरजेप्रमाणे तडजोडी कराव्या लागतात. त्या केल्या गेल्या आहेत. पण, निष्ठावंतांची कदर करण्यात भाजपा इतरांच्या तुलनेत नेहमी पुढे असते. ते याही निवडणुकीत दिसले. भाजपात कोणतीही राजकीय महत्त्वाकांक्षा न ठेवता पडद्याआडून पक्षाच्या विस्तारासाठी काम करणारे असंख्य कार्यकर्ते आहेत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातीला भाजपाचे सरकार सत्तेत आल्यापासून भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना विधानसभा आणि लोकसभेसोबत विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीतही संधी दिली गेली आहे. यासाठी भाजपाच्या राज्यस्तरावरील तसेच केंद्रीय नेतृत्वाचे अभिनंदन केले पाहिजे. निष्ठावंतांना न्याय कसा द्यावा आणि निवडणूक कशी लढवावी, हे जसे भाजपाकडून शिकण्यासारखे आहे, तसेच निवडणूक कशी लढवू नये, हे विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेस पक्षाकडून शिकण्यासारखे आहे. कारण ज्या उमेदवारांनी माघार घेतली, त्यातील बहुतांश काँग्रेसचे आहेत. यातील अनेकांनी तर आपल्या पक्षाच्या प्रदेश पातळीवरील नेतृत्वाला विश्वासात न घेताच माघार घेतली आणि महायुतीच्या अर्धा डझन उमेदवारांच्या अविरोध निवडीचा मार्ग प्रशस्त केला. काँग्रेसमध्ये एकप्रकारे अंतर्गत अराजक आहे ते असे. एकीकडे, एक निवडणूक संपत नाही तोच भाजपा नेतृत्व दुसऱ्या निवडणुकीच्या तयारीला लागते. त्या निवडणुकीला दीड-दोन वर्षांचा कालावधी असला, तरी भाजपा त्या राज्यात आपल्या कार्यकर्त्यांना कामाला लावत असते. याउलट एक निवडणूक संपली की, काँग्रेसचे नेते ढाराढूर झोपून जातात. काँग्रेसचे नेतेच झोपी गेल्यामुळे कार्यकर्त्यांनी तरी जागून काय करायचे? त्यामुळे तेथूढा जागा पाहून आपली पथारी पसरतात. संबंधित राज्यातील निवडणुकीची घोषणा झाल्यावरच काँग्रेसच्या नेत्यांना जाग येते; पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. तोवर भाजपाने आपला कार्यभाग साधलेला असतो, हा नेहमीचा अनुभव. भाजपाला प्रत्येक निवडणुकीत जो दणदणीत विजय मिळतो, त्याचे कारण या पक्षाच्या अशा तयारीत असते. याउलट, काँग्रेसचा जो सतत दारुण पराभव होतो, त्याचे कारण त्या पक्षाच्या नेत्यांच्या ढाराढूर झोपण्यात दडलेले आहे. अशात आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम किंवा आर्थिक व्यवहारावर फोडण्याशिवाय काँग्रेसला पर्याय राहत नाही. आपले घर शाकारायचे राहिले आहे, हेच काँग्रेसला आठवत नाही. निष्ठावंत कोण आणि उपरा कोण हे त्या पक्षाला ठरविता येत नाही. आपल्या पराभवासाठी आपली उदासीनता आणि निष्क्रियता कारणीभूत आहे, हे कधीच काँग्रेसच्या ध्यानात येत नाही. आपल्यावरील दोषाचे खापर दुसऱ्यावर फोडण्यात काँग्रेसच्या नेत्यांचा कोणी 'हात' धरत नाही. काँग्रेसच्या नेत्यांची स्थिती वर्षभर अभ्यास न करता परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यासारखी आहे. असा विद्यार्थी प्रत्येकच पेपर कठीण आला म्हणून रडत असतो. खरे तर असा विद्यार्थी पेपर कठीण आल्यामुळे नाही तर अभ्यास न केल्यामुळे नापास झालेला असतो. पेपर सोपा आला असता तरी तो नापासच झाला असता. कारण सोपा पेपर सोडवायलाही थोडा अभ्यास करणे आवश्यक असते. तो करण्याचे काँग्रेसला पार विस्मरण झालेले आहे. विधान परिषदेच्या उर्वरित ११ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची स्थिती यापेक्षा वेगळी असणार नाही. विधान परिषद निवडणुकीच्या अविरोध निकालांचे कवित्व हेच सांगते. निवडणुकीच्या आखाड्यातील भाजपासारख्या पहेलवानाला पराभूत करायचे असेल तर समोरचा पहेलवानही तेवढ्याच तयारीचा आणि तोलामोलाचा लागत असतो. काडी पहेलवान काही कामाचे नसतात. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची स्थिती अशा काडी पहेलवानांसारखी झाली आहे. त्यांनी आता तरी स्वतःचे घर शाकारण्याची सुरुवात करावी. ज्यांची निष्ठा संशयास्पद आहे, अशांना जवळ केले तर पक्षाचे नुकसान ठरलेले असते. काँग्रेसएवढा इतर कुणीही या वास्तवाचा अनुभव घेतलेला नाही. त्यामुळेच सत्ता सतत काँग्रेसला वाकुल्या दाखवीत असते. एकेकाळी साऱ्या देशावर हुकूमत असलेल्या पक्षाची ही स्थिती त्याच पक्षाच्या नेतृत्वामुळे झालेली आहे. आता तरी घर शाकारण्याचा शहाणपण काँग्रेसला आणि अन्य विरोधकांना मिळो. लोकशाहीसाठी विरोधी पक्ष सबळ असणे गरजेचे आहे. पण, त्यांना सबळ करण्यासाठी इतर कुणी येणार नाही. आपले घर गळत असेल तर ते आपल्यालाच दुरुस्त करावे लागते. आपल्या घराच्या गळतीला शेजारचे जबाबदार आहेत, अशा बोंबा कुठवर ठोकणार? ▮


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# भारतीय तरुण झुरळ नाहीत...!

भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. तरुण असल्याने इथली ऊर्जा प्रचंड आहे. हा देश वेगाने प्रगती करतोय. पण दुर्दैवाने, काही राजकीय महत्त्वाकांक्षी लोक आणि 'ब्रेकिंग इंडिया' फोर्सेस या ऊर्जेला चुकीच्या दिशेला वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. सध्या 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाचे एक तथाकथित उपरोधिक आंदोलन समोर आले आहे. न्यायमूर्तींनी केलेल्या उपरोधक टीकेला उत्तर देण्यासाठी अभिजित दीपके यांसारख्या तरुणांनी सुरू केलेले हे आंदोलन आता वेगळ्या दिशेला जात आहे. अभिजित दीपके यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'कॉक्रोच जनता पार्टी'ची स्थापना केली. वरवर पाहता हे एक उपरोधिक वाटू शकते, पण त्यामागील राजकीय अजेंडा अत्यंत गंभीर आहे. दीपके यांना भारत आणि इथल्या तरुणांची खरी मानसिकता कदाचित कधीच समजली नाही. तरुणांच्या बेरोजगारीच्या प्रश्नांचे भांडवल करून त्यांना व्यवस्थेविरुद्ध भडकवणे हा या आंदोलनाचा मुख्य आधार आहे. प्रश्न असा पडतो की, हे आंदोलन खरोखरच तरुणांच्या हितासाठी आहे की एखाद्या मोठ्या राजकीय षडयंत्राचा भाग?

'कॉक्रोच जनता पार्टी'च्या कारवायांकडे बारकाईने पाहिले तर त्याचे धागेदोरे आम आदमी पार्टी आणि उमर खलीद यांच्यासारख्यांशी जुळताना दिसतात. या आंदोलनाला ठरावीक राजकीय विचारधारेचे समर्थन मिळत आहे. उमर खलीदवर देशाला अस्थिर करण्याचे आणि जेएनयूमध्ये देशविरोधी घोषणाबाजी करण्याचे आरोप आहेत. जर झुरळ आंदोलकांना उमरबाबत आपुलकी वाटत असेल तर ही धोक्याची घंटा आहे. जरी आपल्याला वाटत असलं की हे तरुणांचं आंदोलन आहे, तरी तरुण प्रतिनिधींना पुढे करून 'खडूस पुरोगामी म्हातारे' हे आंदोलन पडद्यामागून चालवत आहेत. या शक्तींचा मूळ उद्देश देशाला अस्थिरता निर्माण करणे आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारविरुद्ध असंतोष पसरवणे हाच आहे. जगामध्ये अनेक देश सध्या अस्थिर आहेत. पण भारतीय तरुण का उठाव करत नाही? का बंड करत नाही? कुठे आहे असंतोष? हे प्रश्न या पुरोगाम्यांना पडले आहेत. इतकी माथी भडकावूनही का इथले तरुण शस्त्र हातात घेऊन राज्यकर्त्यांची गर्दन छाटत नाहीत? हा प्रश्न या सो-कॉल्ड पुरोगाम्यांना सतावतोय आणि म्हणूनच तरुणांच्या हाती शस्त्रे देण्यासाठी आणि देशातील रस्ते रक्ताने रंगवण्यासाठी हे सेक्युलर्स आसुसलेले आहेत. मात्र, या सेक्युलर्सना भारत कळलाय का? भारतीय इतिहासाचा अभ्यास केला तर आपल्याला दिसेल की, इथला तरुण कधीच विध्वंसक नव्हता. भारतीय क्रांतिकारी चळवळीत भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, सावरकर आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या हजारो तरुणांनी सशस्त्र क्रांती केली. त्यांनी इंग्रजांच्या नाकी नऊ आणले.




भारत आणि परदेशी भुईतही या तरुणांनी इंग्रजी रक्त सांडले. हा आततायीपणा नव्हता. सावरकर म्हणाले होते की, 'इंग्रज जर उद्या भारतातून निघून गेले तर ते आमचे शत्रू राहणार नाहीत.' जोपर्यंत ते बळाने भारतावर राज्य करत आहेत, तोपर्यंत ते भारताचे शत्रू आहेत. या क्रांतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे देश स्वतंत्र झाल्यावर या क्रांतिकारकांनी स्वतःहून शस्त्रे खाली ठेवली. हे 'हिंदू भावविश्व' आहे. भारतात बहुसंख्य हिंदू आहे आणि इथे हिंदू तरुणांची संख्या जास्त आहे. हिंदू संस्कृतीमध्ये शस्त्राचा वापर केवळ अन्यायाविरुद्ध आणि संरक्षणासाठी केला जातो. एकदा ध्येय साध्य झाले की, समाज पुन्हा शांतता आणि निर्माणाच्या मार्गाकडे वळतो. पाश्चिमात्य देशांमध्ये किंवा काही कट्टरपंथी विचारधारांमध्ये क्रांतीनंतर अनेकदा गृहयुद्धे होतात, पण भारतात तसे झाले नाही. कारण इथल्या तरुणांच्या रक्तात 'विध्वंस' नाही तर 'सृजन' आहे. अभिजित दीपकेसारख्या झुरळांना आणि त्यांच्या समर्थकांना हा सांस्कृतिक वारसा कधीच कळणार नाही.

आजच्या जेन-झीबद्दल अनेक गैरसमज पसरवले जातात. त्यांना व्यसनी, दिशाहीन किंवा केवळ सोशल मीडियात मग्न असलेले मानले जाते; पण वास्तव वेगळे आहे. अलिकडच्या काही सर्वेक्षणांनुसार, भारतीय तरुणांमध्ये दारू पिण्याचे आणि इतर व्यसनांचे प्रमाण जागतिक स्तरावरील त्यांच्या समवयस्कांच्या तुलनेत कमी होत आहे. आजचा तरुण आपल्या आरोग्याबद्दल, करीअरबद्दल आणि देशाच्या प्रगतीबद्दल अधिक जागरूक आहे. तो केवळ रस्त्यावर उतरून घोषणाबाजी करण्यात रस ठेवत नाही, तर तो स्टार्टअप्स सुरू करत आहे, तंत्रज्ञानात नवनवीन प्रयोग करत आहे आणि जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावत आहे. अशा जागरूक तरुणांना 'झुरळ' म्हणणे हा त्यांचा अपमान आहे. दीपके यांच्यासारखे लोक जेव्हा तरुणांना अशा नकारात्मक नावाखाली एकत्र करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा ते भारतीय तरुणांच्या बुद्धिमत्तेचा अनादर करत असतात. जगभरात अशा अनेक आंदोलनांची उदाहरणे आहेत, जिथे 'लोकशाही' किंवा 'हक्क' यांच्या नावाखाली तरुणांचा वापर करून देश अस्थिर केले गेले. 'अरब स्प्रिंग'चे उदाहरण आपल्यासमोर आहे. इजिप्त, लिबिया, सीरिया या देशांमध्ये अशाच प्रकारे आंदोलने झाली, ज्याचा परिणाम आज आपल्यासमोर आहे, हे देश उद्ध्वस्त झाले आहेत. शेजारील बांगलादेश किंवा श्रीलंका येथे झालेली अलिकडची आंदोलनेही याच दिशेने इशारा करतात. भारतातही 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या माध्यमातून असाच काहीसा प्रयत्न केला जात आहे. तरुणांच्या भावनांना हात घालून त्यांना व्यवस्थेविरुद्ध उभे करणे आणि त्यानंतर देशात अराजकता माजवणे, हा या 'ब्रेकिंग इंडिया' फोर्सेसचा प्लॅन आहे. या शक्तींना भारताची प्रगती बघवत नाही. त्यामुळेच ते अशा विचित्र नावांच्या संघटनांना खतपाणी घालत आहेत. पण एक गोष्ट या शक्तींनी लक्षात ठेवली पाहिजे- भारतीय तरुण हा सुज्ञ आहे. तो भावनांच्या भरात येऊन स्वतःच्या देशाचे नुकसान करणार नाही. त्याला माहिती आहे की, बेरोजगारी किंवा इतर समस्यांवर मात करण्यासाठी 'आंदोलन' नाही तर 'आत्मनिर्भरता' आणि 'कौशल्य विकास' आवश्यक आहे.

भारतीय तरुण हा छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर वाढलेला आहे. त्याला कळते की, कोण आपल्याला प्रगतीकडे नेत आहे आणि कोण अराजकतेच्या खाईत ढकलण्याचा प्रयत्न करत आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी' सारखी आंदोलने ही केवळ क्षणिक बुडबुडे आहेत. त्यांना कोणताही ठोस पाया नाही. अभिजित दीपके आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या शक्तींना हेच सांगावेसे वाटते की, भारतीय तरुणांची शक्ती ओळखा. त्यांना 'झुरळ' म्हणून हिणवून तुम्ही स्वतःचेच हसे करून घेत आहात. भारतीय तरुण हा या देशाचा 'कणा' आहे. तो प्रगतीचा दूत आहे. तो विचारी आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तो राष्ट्रभक्त आहे. ▮


writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'कृत्रिम'ता वाढतेय्

आता पुढील काळ एआयचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) आहे, असे आपण काही वर्षांपूर्वी जाणत्या लोकांकडून ऐकले होते. पण, एआय किती प्रभाव टाकू शकतो, याची कल्पना कोणालाच नव्हती. आता कदाचित तज्ज्ञांना याची पुरेपूर कल्पना येते आहे. एआय आता हातातील मोबाईलपासून मोठमोठ्या तंत्रज्ञानापर्यंत व्यापून उरलाय. काहींचे म्हणणे आहे की, हे सारे चांगलेच आहे. एआयने जगाची कामे सुरळीत केली आहेत. पण, यातील एक मोठा धोका जो पुढील काळाच्या दृष्टीने घातक आहे, त्याविषयी चिंता करण्याची गरज आहे. तो मुद्दा म्हणजे, नवीन पिढी एआयच्या अक्षरशः अधीन झाली आहे.



नव्या पिढीने एआयच्या अधीन होणे ही सामाजिकच नव्हे तर एकूणच जागतिक परिवेशाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. कारण एआयमुळे मुले स्वतःच्या डोक्याने विचार करणे विसरत आहेत. एआयच्या मदतीने ते आपल्या सर्व समस्यांची उत्तरे शोधतात. ही सवय त्यांच्या अभ्यासापर्यंत असती तर ठीक होते. पण, दैनंदिन जीवनातील भावनिक समस्यांच्या बाबतीतही ते एआयची मदत घेताना दिसताहेत.

एका प्राध्यापकाने आपल्या विद्यार्थ्यांना एक असाईनमेंट दिली. दुसऱ्या दिवशी चर्चेदरम्यान त्यांनी पाहिले की, जवळजवळ सर्व विद्यार्थ्यांचे तर्क, उदाहरणे आणि वाक्ये सारखीच होती. हे स्पष्ट होते की, बहुतेकांनी एआयचा वापर केला होता. प्राध्यापकांची चिंता केवळ एआयच्या वापराची नव्हती. त्यांना चिंता होती की, जेव्हा माणूस आपले विचार आणि निर्णय यंत्रांवर सोपवतो, तेव्हा त्याची स्वतःची उपयुक्तताही कमी होऊ लागते. मुलांच्या बाबतीत तर हे आणखी चिंताजनक आहे. जर एखादे मूल सुरुवातीपासूनच एआयवर अवलंबून राहिले, तर त्याच्यामध्ये स्वतंत्र विचारशक्ती विकसितच होऊ शकणार नाही. अशी मुले प्रश्न विचारण्याची, तर्क करण्याची आणि योग्य-अयोग्य यातील फरक समजून घेण्याची क्षमता कदाचित मिळवूच शकणार नाहीत. अशा स्थितीत मग ते आयुष्यातील संकटांचा सामना करणार तरी कसा? सगळीकडे एआय धावून येणार नाही. एक वेळ अशी येते जेव्हा माणसाला आपल्या समस्यांची सोडवणूक आपल्या तर्कबुद्धीने आणि व्यवहार्य वागणुकीने करावी लागते. जपानमध्ये भात आणि माशांपासून बनवल्या जाणाऱ्या सुशी नावाच्या पदार्थाला तयार करणारे शेफ पहिले दोन वर्षे फक्त भात शिजवायला शिकतात. या काळात त्यांना माशाला स्पर्श करण्याचीही परवानगी नसते. याचा उद्देश सुशी बनवण्याच्या कलेसोबतच संयम, शिस्त, एकाग्रता आणि बारकाईने काम करण्याची सवय विकसित करणे हा आहे. मानवी भावनांचा विचार करून या सवयी विकसित करण्यामागे त्यांच्या गुणांचा विकास करणे, हा उद्देश असतो. मानवी विचारशक्ती सर्वोपरी असते, ही यामागील मूळ भावना आहे. मानवामध्ये असलेली अफाट शक्ती हे या जगातील सर्वात मोठे वास्तव आहे. शेवटी ज्या एआयवर आज मानव अवलंबून आहे त्याचा आविष्कार आपोआप झालेला नाही. तो देखील मानवानेच केलेला आहे. मानवाच्या गुणांना अनुभवाची जोड असते. एक कवी जेव्हा कवितेची रचना करतो तेव्हा त्याच्यासाठी तो आत्मानुभव घेत असतो. याउलट, एआयच्या रचना वरवर सुंदर दिसू शकतात, पण त्यांच्यात मानवी अनुभवांतून येणारा तो आत्मा नसतो. एआय आधीपासून अस्तित्वात असलेले पॅटर्न आणि डेटा शिकून काम करते, तर मानवी सर्जनशीलता अनेकदा तेच पॅटर्न मोडून काहीतरी अनोखे आणि नवीन निर्माण करते मुळात, एआयचा वापर करणे चुकीचे नाही, पण त्यावर पूर्णपणे अवलंबून राहिल्याने बौद्धिक विकास थांबू शकतो. म्हणून काही बाबतीत एआयच्या वापरात थोडे बदल करण्याची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पेन हातात धरणे सोडायला नको. जेव्हा संगणक आला, तेव्हा अनेक लोकांनी पेनने कागदावर लिहिणे सोडून दिले होते. आता एआयच्या मदतीने बोलून टाईप करता येतं, ज्यामुळे टाईप करण्याची सवयही कमी होत आहे. जेव्हा आपण लिहितो, तेव्हा केवळ वाक्ये बनवत नाही, तर आपले मन व्यवस्थित करायला शिकतो. आपण एखाद्या विषयावर सखोल विचार करतो, तो समजून घेतो आणि मग आपले विचार योग्य शब्दांत मांडतो. आज नव्या पिढीला पुन्हा लिखाण, वाचन याकडे नेणे फार अवघड दिसत असले, तरी अशक्य नक्कीच नाही. पण, अर्थात यासाठी पालक आणि शिक्षकांनाही स्वतःमध्ये तसा सकारात्मक बदल घडवावा लागेल. 'आम्ही 'बि'घडलो, तुमी 'बि'घडाना' हे वाक्य पालक आणि शिक्षक कसे वापरतात, यावर पुढील पिढीचे भवितव्य अवलंबून राहील, हे नक्की. ▮

९४०३२ ११६७३


## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# उबाठाचा रडबाळा!

विधान परिषद निवडणुकीत मतदान होण्यापूर्वीच महाविकास आघाडीवर (मविआ) जी नामुष्की ओढावली आहे, त्याने विरोधकांच्या गोटातील अंतर्गत धुसफूस आणि अविश्वास चव्हाट्यावर आणला आहे. आत्मविश्वास खचला आहे. तब्बल पाच जागांवर मतदानाचा टप्पा गाठण्यापूर्वीच मविआच्या अधिकृत उमेदवारांनी घेतलेली माघार ही केवळ राजकीय नामुष्की नसून उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या नेतृत्वाचा झालेला नैतिक पराभव आहे. मात्र, नेहमीप्रमाणे या पराभवाचे प्रामाणिक आत्मपरीक्षण करण्याऐवजी उबाठा गटाचे एकमेव विद्वान प्रवक्ते संजय राऊत यांनी पुन्हा एकदा 'खोके' आणि '१५० कोटींच्या व्यवहारांचे' तेच जुने, गुळगुळीत झालेले रडगाणे गाण्यास सुरुवात केली आहे. स्वतःच्या पक्षातील गळती आणि कार्यकर्त्यांमधील प्रचंड असंतोष लपवण्यासाठी राऊत यांनी लावलेले हे 'भ्रष्टाचार पुराण' म्हणजे निव्वळ रडबाळा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकांच्या निमित्ताने महाविकास आघाडीचा (मविआ) मुखवटा पुन्हा एकदा गळून पडला आहे. स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतून विधान परिषद सदस्यांसाठी सुरू असलेल्या निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी जे काही नाट्य घडले, त्याने विरोधकांच्या गोटातील उघडेबोघडे राजकारण आणि अंतर्गत अविश्वास राज्याच्या जनतेसमोर उघडा पाडला आहे. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, अहिल्यानगर, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठेच्या जागांवर मतदानाच्या आधीच महाविकास आघाडीला मानहानिकारक परिस्थितीला सामोरे जावे लागले आहे. मतदान होण्यापूर्वीच महाविकास आघाडीने जागा गमावल्याने त्यांच्यावर मोठी नामुष्की ओढवली आहे. नेहमीप्रमाणे या नामुष्कीचे खापर स्वतःच्या अकार्यक्षमतेवर फोडण्याऐवजी उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा 'घोडेबाजार'च्या वांझोट्या गप्पा मारत भाजपावर चिखलफेक करण्याचा केविलवाणा प्रयत्न चालवला आहे. ज्या पक्षात कार्यकर्त्यांचा आदर उरलेला नाही, ज्या पक्षाच्या नेत्यांना स्वतःचे अधिकृत उमेदवार सांभाळता येत नाहीत आणि ज्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे त्यांचेच उमेदवार त्यांना सोडून जात आहेत, त्या पक्षाचे प्रवक्ते आज लोकशाहीच्या आणि नैतिकतेच्या गप्पा मारत आहेत, हा महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील सर्वात मोठा विनोद म्हणावा लागेल.



राऊत यांच्या या विधानाकडे बारकाईने पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते- हा त्यांच्या वैचारिक आणि संघटनशक्तीच्या पराभवाचा थेट कबुलीजवाब आहे. ज्या बाळ माने (कोकण) आणि देवयानी डोणगावकर (छत्रपती संभाजीनगर) यांना उबाठा गटाने मोठ्या थाटामाटात तिकीट दिले होते, त्यांनीच ऐनवेळी पक्षाला सोडचिठ्ठी दिली किंवा अर्ज मागे घेतला. राऊत ज्यांना विरोधी पक्षाचे घोडे म्हणत आहेत, ते घोडे मूळचे उबाठा आणि महाविकास आघाडीच्या तबेल्यातील होते, हे ते सोयीस्करपणे विसरले आहेत. जर तुमचे स्वतःचे उमेदवार विकले जात असतील, तर याचा अर्थ असा की, तुमचे घोडे तुमच्या कंट्रोलमध्ये नाहीत. मुळात राजकारणात सर्वच पक्ष आपापल्या परीने मोर्चेबांधणी करीत असतात. जर महायुतीचे नेते विरोधी उमेदवारांचे मतपरिवर्तन करण्यात यशस्वी ठरत असतील आणि निवडणुका बिनविरोध करून राज्याचा अनावश्यक निवडणूक खर्च वाचवत असतील, तर त्याचे स्वागत करण्याऐवजी त्यात 'भ्रष्टाचार' शोधणे म्हणजे 'काविळ' झालेल्या डोळ्यांचे लक्षण आहे. महायुतीच्या जागावाटपात रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (कोकण) ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेली होती तर महाविकास आघाडीकडून शिवसेना उबाठाने बाळ माने यांना रिंगणात उतरवले होते. कोकण हा एकेकाळी शिवसेनेचा अभेद्य किल्ला मानला जायचा. मात्र, उद्धव ठाकरेंच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि मुंबईत बसून दरबारी राजकारण करण्याच्या वृत्तीमुळे कोकणातील स्थानिक नेत्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. बाळ माने यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला; विशेष म्हणजे, त्यावेळी भाजपाचे नेते आणि मंत्री नितेश राणे तेथे उपस्थित होते. या घटनेनंतर उबाठा गटाने बाळ माने यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची घोषणा केली. मात्र, मूळ प्रश्न असा आहे की, बाळ माने यांनी हा निर्णय का घेतला?

छत्रपती संभाजीनगरमध्ये उबाठा गटाने कृष्णा डोणगावकर यांच्या पत्नी देवयानी डोणगावकर यांना उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांनीही ऐनवेळी माघार घेऊन उबाठा गटाला मोठा धक्का दिला. यानंतर देवयानी डोणगावकर आणि कृष्णा डोणगावकर या दोघांचीही पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. संभाजीनगर हा बाळासाहेब ठाकरेंचा बालेकिल्ला होता. मात्र, जेव्हापासून उद्धव ठाकरेंनी केवळ सत्तेच्या मोहापायी काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी घरोबा केला, तेव्हापासून संभाजीनगरमधील निष्ठावंत शिवसैनिक आणि नेते गुदमरत आहेत. ज्या शहराचे नाव 'छत्रपती संभाजीनगर' करण्याला काँग्रेसने वर्षानुवर्षे विरोध केला, त्याच काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या उबाठा नेत्यांच्या प्रचाराला सामोरे जाणे स्थानिक नेत्यांना अशक्य झाले असावे. देवयानी डोणगावकर यांनी घेतलेली माघार ही उबाठा गटाच्या बदललेल्या विचारसरणीच्या आणि हुकूमशाहीच्या विरोधात कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या तीव्र संतापानंतरची होती. आपल्याच उमेदवारांना सांभाळता न येणे आणि नंतर त्यांच्यावर पैशांचे आरोप करून स्वतःचे हात झटकणे, हा उबाठा गटाचा नेहमीचाच ढोंगीपणा आहे. काँग्रेसनेदेखील आपल्या उमेदवारावर बडतर्फीची कारवाई करून आपली कातडी वाचविण्याचा प्रयत्न केला. केवळ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपल्या अर्ज मागे घेणाऱ्या श्रीकांत पाटील या उमेदवारावर कारवाई केलेली नाही.

तुम्हीच उभे केलेले उमेदवार जर 'गधे-घोडे' असतील, तर ते बाजारात विकले जाणारच! आता गध्याच्या आणि घोड्याच्या रेटमध्ये थोडाफार फरक नक्कीच असेल, पण शेवटी विकाऊ ते विकाऊच! आपल्या तबेल्यात आपण नक्की कोणाला पोसतोय आणि कोणाला तिकीट वाटतोय, या एवढ्या साध्या गोष्टीची कल्पना जर पक्षप्रमुखांना नसेल, तर मग हे गधे-घोडे गोळा करून पक्ष चालवण्याचा धंदा कशाला करता? त्यापेक्षा हा राजकीय गाढवबाजार थांबवा, पक्ष चालवणं सोडा आणि दुसरा एखादा चांगला व्यवसाय सुरू करा... स्वतःच्या उमेदवारांवर 'विकाऊ' शिक्का मारून संजय राऊत यांनी स्वतःच्याच पक्षप्रमुखांच्या पारख करण्याच्या क्षमतेचे धिंडवडे काढले आहेत, एवढे मात्र निश्चित! ▮

९२७०३३३८८६

### सिग्नल्स वेळेचे पुनर्निर्धारण व्हावे

नागपूर शहराचा प्रचंड विस्तार होत आहे. त्या प्रमाणात तशीच बेशिस्त वाहतूकदेखील वाढते आहे. चौकाचौकात असलेले सिग्नल्स कोणी लाल दिव्यावर थांबेल या आशेने पाहात आहेत. दुचाकी असो की चारचाकी कोणीही हिरव्या दिव्याची वाट पाहात नाही. काही ठिकाणी डिजिटल घड्याळी लागली आहेत; तिथे वाहक थोडा थांबण्याचा संयम दाखवितात. अन्य ठिकाणी तर लाल सिग्नलसमोरच वाहने पुढे निघतात. शहराबाहेर रिंग रोडच्या डावी-उजवीकडे रहिवासी वसाहती आहेत. ते रस्ते चौकाला येऊन मिळतात. यावर मुख्य रस्त्यापेक्षा वाहनांची तुरळक वाहतूक असते. मात्र, सर्व सिग्नलचा वेळ सारखाच असतो. त्यामुळे तिकडून वाहने येत नाहीत, हे बघून मुख्य रस्त्यावरील वाहने हिरव्या सिग्नलची वाट न बघता निघून जातात. प्रशासनाने अशा मोठ्या चौकातील सिग्नलसवर वेळेचे पूर्वनिर्धारण करावे. मुख्य रस्त्यावरील वाहनांना ६० आणि वस्ती रस्त्यांना २० सेकंदापेक्षा जास्त वेळ द्यावा तसेच एका बाजूच्या लाल सिग्नलनंतर दुसऱ्या बाजूच्या हिरव्या सिग्नलमध्ये किमान १० सेकंदाचा फरक असावा; म्हणजे हिरव्यानंतर होणारी वाहतूक पूर्ण होईल. अनेक प्रसंगी हिरव्या सिग्नलची वाहने आपल्या दिशेने जात असताना चौकात मध्येच राहतात आणि दुसऱ्या हिरव्या सिग्नलची वाहने त्यांच्या पुढ्यात ठाकतात. अशा वेळेस संपूर्ण सिग्नल्सचा बोजवारा उडतो. वाहतूक तुंबून राहते. पश्चिम नागपूर शहरातील अनेक लहान चौकात सिग्नल्स आहेत, पण त्यांचे पालन होत नाही. संबंधित अधिकारी याकडे लक्ष देतील, अशी आशा आहे.

**संजय पाठक**/नागपूर

### वृक्षारोपणाचा संकल्प पूर्ण करा

पावसाळा जवळ आला आहे. शासनाने विस्तृत प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प जाहीर केला आहे आणि जनतेला सहभागासाठी आवाहन केले आहे. जनता आपल्यापरी त्या आवाहनाला प्रतिसाद देईलच. शाळा-कॉलेजेसच्या स्तरावर, प्रतिष्ठानांच्या स्तरावर वृक्षारोपणांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. गृहनिर्माण संस्था, स्थानिक मंडळं आणि समित्या वृक्षारोपणात सहभाग घेतात. काही जण आईच्या नावाने तर काही परिवारातील सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त झाडे लावण्याचा उपक्रम करतात. हे उत्साहवर्धक आहे. पण लक्षात असे येते की, साधारणपणे झाडे लावली जातात ती एकत्र राहत्या घराच्या जवळपासच्या मैदानात किंवा वस्तीच्या परिसरात. शहरात क्वचितच एखादे मैदान असेल की, ज्याच्या चहुबाजूस मोठे वृक्ष नसतील! खरी आवश्यकता आहे ती शहराच्या बाहेर, जवळपासच्या उघड्या पडलेल्या टेकड्या-डोंगरांवर झाडे लावण्याची. त्यासाठी काही उपाय सुचवासे वाटतात...

१. शासनाने शहरालगतच्या टेकड्या/डोंगरांवरच्या जागा हेरून त्यांच्या उतरणीवर साधारणपणे ५' रुंद अशा सपाट पायऱ्यांची उतरंड तयार करावी. त्या पायऱ्यांवर, योग्य अंतर ठेवून, आर्द्रता धरून ठेवणारी आणि पावसाच्या पाण्यावर स्वतःहून वाढणारी आणि तग धरणारी मोठी झाडे, उदा. वड, पिंपळ, कडूनिंब, उंबर, पळस, सागवण इत्यादी झाडे लावण्याचे जनतेला आवाहन करावे, त्यासाठी रोपांची व्यवस्था करावी.

२. नागरिक उस्फूर्तपणे वृक्षारोपणाचे कार्यक्रम करण्याची योजना आखतात तेव्हा त्यांनी सामूहिकपणे, सहपरिवार सहलीच्या रूपांत गावाबाहेर जाऊन शासनाने उपलब्ध करून दिलेल्या परिसरात वृक्षारोपण करावे.

३. प्रतिष्ठाने, संस्था, सोसायट्यांनी त्यांच्या सभासदांकरिता सहलीचे आयोजन करावे. सोबत काही मजूर न्यावे. स्वतःच गावाबाहेरच्या टेकड्या/डोंगरांवरच्या जागा हेरून, सरकारी परवानगीने तेथे झाडे लावावीत. पायथ्याशी फळ झाडे लावावी.

४. दोन मोठ्या झाडांच्या मधल्या जागेत जंगली वनस्पतींच्या किंवा फूल झाडांच्या बिया टाकाव्या; जेणेकरून उतारावरून येणारे पाणी सरसकट वाहून न जाता अडलेले पाणी जमिनीत मुरेल.

५. शासनाने डोंगरमाथ्यावरच्या पठारी भागात खड्डे खणून किंवा बोड्या तयार करून त्याभोवती उंच वाढणारी झाडे लावण्याची योजना आखावी.

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

## वाचक पत्रे

### लोभी व्यवस्थेचे बळी

तरुण भारत दि. ०४.०६.२०२६ मधील 'दिल्लीत हॉटेलला आग; २१ जणांचा मृत्यू' ही बातमी वाचून हळहळ वाटली. स्वार्थी हॉटेल चालक आणि त्यांच्या हॉटेल आरेखनातील त्रुटींकडे दुर्लक्ष करून राजरोस व्यवसाय करू देणाऱ्या प्रशासकीय लालची वृत्तीचे हे बळी आहेत. मृतांमध्ये परदेशी नागरिकही बहुसंख्येने असल्याने आपल्या देशातील अनागोंदीचे प्रतिकूल पडसाद उमटले तर त्याला जबाबदार कोण? याचा अर्थ आता ग्राहकांनीच हॉटेलसाठीच्या परवानग्या, संकटकाळी बाहेर पडण्याचे पर्यायी मार्ग व त्यांचं ठळक दिशादर्शन, दोन जिने मार्ग, सुस्थितीतील लिफ्ट, खोल्यांचा ऐसपैसपणा आणि खिडक्या-दारं, तेथील सेवकवर्गाची व्यवस्था आणि तत्परता, संकटकाळी ग्राहकांना मार्गदर्शन करण्याचं त्यांना प्रशिक्षण दिलंय का, अग्निशमन दलाची विनाशर्त परवानगी या गोष्टींची शहानिशा करणं आवश्यक आहे. नाही तर हॉटेल मालकांची मनमानी आणि आर्थिक हितसंबंध जपणाऱ्या प्रशासकीय उदासीनतेचे असे हकनाक बळी जातच राहतील. अशा कोडग्या मानसिकतेच्या सर्वांनाच सदोष मनुष्य वधाचे गुन्हेगार ठरवून लवकरात लवकर कठोर शिक्षा करावी. ▮

**श्रीपाद कुलकर्णी** /बिबवेवाडी-पुणे, ९४२२५१५६४०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बीड पोलिसांची खाकी डागाळली; शेतकऱ्याच्या मुलाला धमकी देणारा लाचखोर पोलीस अंमलदार बळवंत अखेर जाळ्यात

## अपघात विम्याच्या कागदपत्रांसाठी दहा हजारांची लाच घेताना जालना एसीबीची नेकनूर पोलीस ठाण्यात धडक कारवाई

**बीड :** नेकनूर पोलीस ठाण्याच्या कार्यकाळात पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करत न्याय मागणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाला "कॅरेक्टर खराब करून टाकेल बेट्या" अशी उघड धमकी देणारा पोलीस अंमलदार दत्तात्रय बळवंत अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. एका अपघातग्रस्त मयताच्या विमा मंजुरीच्या कागदपत्रांसाठी दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) त्याला रंगेहात अटक केली. या धडक कारवाईमुळे बीड आणि जालना पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली असून, तत्कालीन पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेवर आता गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याबाबत मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, नेकनूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार चंद्रकांत गोसावी यांच्या कार्यकाळात पोलीस यंत्रणा जनतेऐवजी पवनचक्की आणि सौर कंपन्यांसाठी काम करत असल्याचे चित्र होते. अवैध धंद्यांसोबतच कंपन्यांना लुटण्यासाठी मोकळे रान मिळाले होते. या विरोधात प्रसिद्धी माध्यमांनी आवाज उठवला होता. याच दरम्यान कानडी घाट येथे विद्युत टॉवर उभारणी करताना आपला हक्काचा मावेजा मागणाऱ्या एका निष्पाप शेतकऱ्याच्या मुलाला "अय शहाणपणा करू नको, सातबारा दाखव नाहीतर कॅरेक्टर खराब करून टाकेल बेट्या!" अशी अत्यंत उद्धटपणे धमकी देतानाचा पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय बळवंत याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. त्यावेळी कर्तव्यदक्ष म्हणवणारे तत्कालीन पोलीस अधीक्षक नवनीत कावत




आणि ठाणेदारांनी बळवंतवर कारवाई करण्याऐवजी त्याची पाठराखण केली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या या अप्रत्यक्ष पाठिंब्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी मुकाट्याने अन्याय सहन करत गेले.

मात्र, ज्या बळवंतची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठराखण केली, त्याचे स्वतःचे 'कॅरेक्टर' किती खराब आहे हे या ताज्या कारवाईने उघड केले आहे. येळंब येथील एका व्यक्तीचा काही दिवसांपूर्वी भीषण अपघात झाला होता आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. मयताच्या मुलाने वडिलांच्या अपघात विम्याचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय कागदपत्रांची मागणी अंमलदार दत्तात्रय बळवंत याच्याकडे केली होती. दुःखात असलेल्या कुटुंबाला मदत करण्याऐवजी बळवंत याने ती कागदपत्रे देण्याच्या मोबदल्यात दहा हजार रुपयांच्या लाचेची थेट मागणी केली. तक्रारदाराने या जुलुमाविरोधात थेट जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली.

जालना एसीबीच्या पथकाने प्रकरणाची गुप्तपणे शहानिशा केली असता लाचेची मागणी सिद्ध झाली. त्यानुसार शनिवारी दुपारी नेकनूर पोलीस ठाण्याच्या परिसरातच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अत्यंत नेटका सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना अंमलदार दत्तात्रय बळवंत याला रंगेहात पकडण्यात आले. ही यशस्वी कारवाई जालना एसीबीचे उपाधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखालील पथकाने केली असून, आरोपी बळवंत विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

या धडक कारवाईनंतर नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील जनतेतून आणि शेतकरी वर्गातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकऱ्याच्या मुलाला धमकी दिली होती त्याच वेळी जर तत्कालीन पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी बळवंतवर कडक कायदेशीर कारवाई केली असती, तर आज लाच घेताना पकडले जाऊन बीड पोलिसांची खाकी अशी डागाळली नसती, असा संतप्त सूर आता नागरिकांमधून उमटत आहे.

# पंकजाताई मुंडे यांनी आईसह घेतले श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरीतील भगवंतांचे दर्शन

## कार्यकर्त्यांनी गावोगावी केले जल्लोषात स्वागत

**माजलगांव दि. ०५ - :** अधिकमासाचे औचित्य साधून राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह आज श्रीक्षेत्र पुरूषोत्तम पुरीला भेट देऊन भगवंताचे मनोभावे दर्शन घेतले. दौऱ्यात जागोजागी कार्यकर्त्यांनी वाहनाचा ताफा थांबवून त्यांचे वाजत-गाजत जल्लोषात स्वागत केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त त्यांच्या हस्ते भाजयुमोच्या वतीने वृक्षारोपण देखील करण्यात आले.

अधिक मासाचे औचित्य साधून भगवान पुरुषोत्तम यांच्या दर्शनाला आणि पूजेला अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत विशेष महत्त्व आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासोबत मंदिराला भेट देऊन ईश्वराचे मनोभावे दर्शन घेतले आणि विधिवत पूजा-अर्चा केली. सर्व सामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमयता लाभो, अशी प्रार्थना त्यांनी भगवान पुरुषोत्तम यांच्या चरणी केली. यावेळी भाजपचे नेते अरूण राऊत, माधव निर्मळ, डॉ. अशोक तिडके, ज्ञानेश्वर मेंडके, मंडलाध्यक्ष रुपाली कचरे, शरद कचरे, विनायक रत्नपारखी, अभिजित सोळंके, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, दिपक मुंडे, प्रदीप जाधवर आदींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बायपासवरील उड्डाणपूल व सर्व्हिस रोडची कामे युद्धपातळीवर

## डिसेंबर 2026 पर्यंत कामे पूर्ण करण्याचे आ.संदीप क्षीरसागर यांचे निर्देश

**बीड दि.५ (प्रतिनिधी):-** बीड शहरा जवळील बायपास मार्गावर सुरू असलेल्या उड्डाणपूल आणि स्लीप सर्व्हिस रोडच्या कामांची आमदार संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (NHAI) अधिकारी आणि संबंधित कंत्राटदारांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. प्रलंबित असलेली ही कामे आता प्रत्यक्ष सुरू झाल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले असून, डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

केंद्र सरकार आणि आयआरसीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बीड शहरात प्रवेश करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल, तसेच बीड-इमामपूर, बीड-नाथापूर आणि बीड-परळी मार्गांना जोडणारे स्लीप सर्व्हिस रोड असणे आवश्यक होते. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या चुकीच्या नियोजनामुळे ही कामे रखडली होती. या दुर्लक्षामुळे बायपासवर झालेल्या अपघातांत आतापर्यंत १३ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. ११७६/२०२४ दाखल केली होती. न्यायालयाने ही याचिका मान्य करत २५ सप्टेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल, तसेच बीड-इमामपूर, बीड-नाथापूर व बीड-परळी मार्गांवर स्लीप सर्व्हिस रोड उभारण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर आता छत्रपती संभाजी महाराज चौक आणि महालक्ष्मी चौक येथील उड्डाणपूल तसेच इतर मार्गांवरील स्लीप सर्व्हिस रोडची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

# वाढवणा ते चौसाळा (ता. बीड) सुरु असलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता

## स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**बीड :** वाढवणा ते चौसाळा (ता. बीड) या दहा किलोमीटर अंतरासाठी सुरू असलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचा आरोप करत पिंपळगाव घाट, वाडवाना, मानेवाडी, माळेवाडी आणि रुईगव्हाण येथील ग्रामस्थांनी मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. या कामाची बाहेरील जिल्ह्यातील स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत 494.67 लक्ष रुपये अपेक्षित खर्चाच्या सुरू असलेल्या चौसाळा वाढवाना रस्त्याच काम मस्के इन्फ्रास्ट्रक्चर बीड करीत आहे. या रस्त्यावर टाकण्यात येत असलेला छोट्या खडीचा लेयर इस्टिमेटनुसार नसून अत्यंत कमी जाडीचा आहे. तसेच खडीमध्ये आवश्यक प्रमाणात डांबर न वापरता ऑइलचा अधिक वापर करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे डांबरीकरणाचे काम सुरू असतानाच काही ठिकाणी रस्ता उधळून गेल्याचे दिसून येत आहे. पहिल्याच पावसात खडीवरील डांबर वाहून गेल्याने अनेक ठिकाणी रस्त्याची अवस्था पुन्हा मुरूम रस्त्यासारखी झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

याशिवाय चौसाळा परिसरातील पुलालाही मोठे भगदाड पडले असून पावसाळ्यापूर्वीच पूल धोकादायक स्थितीत पोहोचल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पुलाल भेट देऊन दर्जेदार काम करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र संबंधित ठेकेदार प्रशासन आणि जनतेच्या डोळ्यात धूळफेक करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या मार्गावरून पाच गावांतील नागरिकांचे दैनंदिन दळणवळण सुरू असल्याने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. खराब रस्त्यामुळे नागरिकांना मणक्याचे विकार, श्वसनाचे त्रास तसेच गंभीर रुग्णांना वेळेत उपचारासाठी नेण्यात अडचणी येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संपूर्ण रस्त्याचे नव्याने दर्जेदार डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच योग्य कारवाई न झाल्यास धुळे-सोलापूर महामार्गावर पाचही गावांच्या वतीने भव्य रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल आणि ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनावर पाचही गावांतील नागरिकांच्या मोठ्या संख्येने सह्या करण्यात आल्या आहेत.

# महेंद्र गड ऊर्फ चांभार गड प्रादेशिक पर्यटन व तीर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करावा

## ॲड.शिवाजी कांबळे यांचे निवेदन



**अंबाजोगाई :** मौजे चांभारखिंड, ता.महाड (जि.रायगड) येथील महेंद्र गड ऊर्फ चांभार गड हा किल्ला प्रादेशिक पर्यटन व तीर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करावा अशी मागणी करून महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी गुरूवार, दिनांक ४ जुन २०२६ रोजी निवेदन दिले आहे.

समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदरील विषयी यापूर्वी दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी ना.शंभुराजे देसाई (मंत्री, पर्यटन, महाराष्ट्र राज्य.) यांचे नांवे आपण शिफारसपत्र दिलेले होते. त्यामुळे मंत्री ना.भरतशेठ गोगावले यांचे फंडातून पायऱ्याचे एका टप्प्याचे काम पुर्ण होत आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम राहिलेले आहे. चांभार गड हा किल्ला महाराष्ट्रातील संपुर्ण चांभार समाजाचा श्रध्देचा, अस्मितेचा, शौर्याचे प्रतिक असणारा गड आहे, त्यामुळे आपण परत, दुसऱ्यांदा शिफारसपत्र दिल्यास गडाचे दुसऱ्या टप्प्यातील काम सुरू होईल म्हणुन आपण परत एकदा दुसरे शिफारस पत्र द्यावे व चांभारगडास भेट द्यावी. तसेच मौजे चांभार खिंड, ता.महाड (जि.रायगड) येथील महेंद्रगड ऊर्फ चांभारगड या किल्यास प्रादेशिक पर्यटन व तिर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी केली आहे. अशी माहिती समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी दिली आहे.

# परशुराम संस्कार सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**बीड । प्रतिनिधी :** परशुराम संस्कार सेवा संघ, बीड जिल्हा यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्राह्मण समाजातील दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या पदाधिकारी बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला.

इयत्ता दहावी (एसएससी, सीबीएसई, आयसीएसई) तसेच बारावी (एचएससी) परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव रविवार, दि. 21 जून 2026 रोजी सायंकाळी 6.30 वाजता कोरडे गणपती मंदिर कार्यालय, काळे गल्ली, बीड येथे करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून, त्यासाठी विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव व गुणपत्रिकेची प्रत संबंधित पदाधिकार्यांच्या व्हॉट्सप क्रमांकावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. समाजातील अधिकाधिक गुणवंत विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे. याबाबतची माहिती संघाचे जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर यांनी दिली. तसेच समाजातील सर्व स्तरांतील पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

नोंदणी व अधिक माहितीसाठी श्री. गजानन जोशी, बाळासाहेब थिगळे (मो.9423172327) संजय कुलकर्णी, बाबा पाठक, मुकुंद खडकीकर, सौ. मंगलताई आगवान, सौ. सुषमाताई थिगळे आणि सौ. अर्चनाताई जोशी यांच्याशी संपर्क साधावा, असे संघातर्फे कळविण्यात आले आहे.

# नेत्रदान श्रेष्ठ दान उपक्रम : आदित्य महाविद्यालयात 9 जून रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन

**बीड :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नित तथा आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'नेत्रदान श्रेष्ठ दान' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे ९ जून रोजी आयोजन करण्यात आले आहे. समाजामध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती निर्माण करणे, नेत्रदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि जास्तीत जास्त नागरिकांना यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबवले जातात.त्याचाच एक भाग म्हणून या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व मानव सेवेची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

हे व्याख्यान मंगळवार, ९ जून २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. ते उपस्थितांना नेत्रदानाचे सामाजिक, वैद्यकीय, नैतिक व मानवतावादी महत्त्व याविषयी सविस्तर व मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे राहणार आहेत.या व्याख्यानास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रासेयो विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

एक नेत्रदान-दोन व्यक्तींना प्रकाशदान नेत्रदानामुळे मृत्यूनंतरही एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांमधून दुसऱ्या गरजू व्यक्तीला दृष्टी मिळू शकते. नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा मानली जाते. अंधत्वाने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना नवजीवन देण्याचे सामर्थ्य यात असल्याने प्रत्येकाने या विषयाकडे सकारात्मकतेने पाहण्याची गरज आहे.

# विविध सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**बीड, प्रतिनिधी :** शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त बीड मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून अभिष्टचिंतन करण्यात आले. रक्तदान शिबीर, अन्नदान, किराणा किट वाटप, वृक्षारोपण तसेच शालेय साहित्य वितरण यांसारख्या उपक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकी जपत शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी वाढदिवस साजरा केला.

बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यास विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व उद्योजक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून अनिलदादा जगताप यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी असंख्य महिलांनी एकत्रित येत ५६ दिव्यांनी औक्षण करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला.

वाढदिवसानिमित्त बीड शहरातील जिव्हाळा आश्रम तसेच ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्पात भव्य अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात शिवसैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, किराणा किटचे वाटप करण्यात आले, तर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणही करण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये हजारो नागरिक, शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्नेहीजन सहभागी झाले होते. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करताना अनिलदादा जगताप यांनी समाजोपयोगी कार्यांमधून जनसेवा करण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याची भावना व्यक्त केली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)पक्षाच्या वर्धापन दिन सोहळा मुंबईत : राजेंद्र मस्के

## पक्षातील आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना निमंत्रित

**बीड प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिना निमित्त मुंबई येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा. शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षते खाली हा वर्धापन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

**दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ठीक १०:००** वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या या वर्धापन दिन सोहळ्यास राज्यभरातील प्रमुख नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष यांनी जारी केलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, पक्षाने मा. पवार साहेब यांच्या खंबीर, संयमी आणि मुत्सद्दी नेतृत्वाखाली जनसेवेचा मोठा प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला आहे. शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला, सहकार, सामाजिक न्याय आणि पुरोगामी विचारांचा वारसा जपत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

वर्धापन दिन हा केवळ उत्सव नसून पक्षाच्या संघर्षमय आणि लोकाभिमुख वाटचालीचा गौरवशाली टप्पा आहे. आगामी काळातील पक्षाची दिशा, संघटन मजबुतीकरण, जनतेच्या प्रश्नांवरील भूमिका आणि कार्यकर्त्यांच्या नव्या उर्जेचा संदेश या सोहळ्यातून दिला जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हा प्रमुख पदाधिकारी,आजी-माजीलोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक

लोकसभा विधानसभा निवडणुक उमेदवार,

तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, फ्रंटल सेलचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने मुंबई येथे उपस्थित राहावे.

"साहेबांच्या विचारांची मशाल अधिक जोमाने पुढे नेण्यासाठी आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभागी व्हावे.

असे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**

मुख्य कार्यालय :- दीनदयाळ भवन परळी रोड, अंबाजोगाई जि बीड फोन संपर्क क्र 02446-246927

ऑफिस पत्ता :- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी रोड, अंबाजोगाई, फोन क्र ०२४४६-२४६९२७

जा क्र. दीन / मू का./वसूली /०९/ टी एल ११२, एचवायपी-३७/३८/ २०२६-२७ दिनांक:- ०४.०६.२०२६

परिशिष्ट ४ अ

नियम ८ व ९ नुसार

**मालमत्ता, शेड व मशीनरी विक्रीची सूचना**

विक्री नोटीस (मालमत्ता, शेड व मशीनरी)

सेक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधारण लोकस तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहनखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देऊनही **१.** कर्जदार मे शांभवी ॲग्रो इंडस्ट्रीज प्रो प्रा पवार आनंद त्र्यंबक मू पो साई, ता व जिल्हा लातूर, **२.** सहकर्जदार श्री पवार सुधीर आनंदराव रा. मू पो साई, ता व जिल्हा लातूर, **३.** जामीनदार नितीन शरद भालेराव रा. सराफ लाइन लातूर, ता लातूर जि लातूर **४** जामीनदार आकाश दशरथ सूर्यवंशी रा. दत्त दिगंबर वसतिगृह, संभाजी नगर लातूर, ता लातूर जि लातूर **५.** जामीनदार गिरीसाहेब धोंडीरम पवार रा. मू. महापूर, ता. रेणापुर, जि. लातूर **६.** जामीनदार गजेंद्र दिगंबर बन रा. मू. पोस्ट. साई, लातूर ता लातूर जि लातूर सदर कर्जदार/ गहाणदार यांनी दि १९/१२/२०२० व दि २९/०४/२०२४ रोजी दस्त रक्कम रु ४१,००,०००/- (अक्षरी रक्कम एकेचाळीस लक्ष रुपये) चे **नजर गहण** बँकेच्या नावे करून दिले आहे. निम्न लिखित जागेचा व मशीनरी चा ताबा दि २४/०८/२०२३ रोजी घेतला आहे.

वर नमूद केलेल्या कायद्याअंतर्गत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण मालमत्ता, शेड व मशीनरी ची निविदा द्वारे विक्री करण्याकरिता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण मालमत्ता, शेड व मशीनरी ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सील बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक ३१/०५/२०२६ रोजी थकीत रक्कम रु. **७९,७७,५५६/-** (अक्षरी:- एकोनेंशी लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे छप्पन रु. ) अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसूली करिता निविदा मागविण्यात हेत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली मालमत्ता, शेड व मशीनरी तिन्ही पैकी कोणतीही एक / दोन किंवा सर्व एकत्रित विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा लातूर या पत्त्यावर सीलबंद पाकीट मध्ये अनामत रक्कम (प्रत्येकी) राशी रक्कम रु ५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा लातूर यांचे नावे असलेला डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर जोडून दिनांक ०६/०७/२०२६ , पर्यन्त कार्यालयीन वेळेत सादर करावे.

| मालमत्तेचा तपशील | टिन शेड | मशीनरी तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अ क्र | मशीनरी चे नाव | नग | मशीनरीची मार्केट किंमत |
| मौजे साई, तलाठी सज्जा महापूर, ता. जि. लातूर येथील गट नं १८१ (भाग), ग्रा प मी क्र ४६८ , ग्रा प मी क्र ५२७ मधील आकृषी क्षेत्र १२६२ चौ मी व त्यावरील सर्व बांधकाम सह<br>**मालमत्तेच्या चतुरसीमा**<br>पूर्व – बंकटराव देशमुख यांचे गट नं १७१<br>पश्चिम – गट नं १७२ मधील गावठाण जमीन<br>दक्षिण बंकटराव देशमुख यांचे गट नं १७१<br>उत्तर – १२ मी अंतर्गत रोड आणि मोकळी जागा / १५ मी रोड<br>(वरील मशीनरी " जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत ") | GI Tin shed<br>लांबी x रुंदी<br>१००' x ३०'<br>= २७८.१२ चौ. मी. | १ | MS WATER TANK | 2 | 40,000/- |
| | | २ | POHA MACHINE | 3 | 75,000/- |
| | | ३ | ELEVATOR | 4 | 10,000/- |
| | | ४ | GI SHEET | 4 | 800/- |
| | | | | | 1,25,800/- |

| राखीव किंमत | | |
|---|---|---|
| मालमत्ता राखीव किंमत – **१७,३५,२५०/-** (अक्षरी- सतरा लक्ष पस्तीस हजार दोनशे पन्नास रुपये फक्त) | GI Tin शेड राखीव किंमत- **२,७५,०००/-** (अक्षरी – दोन लक्ष पंच्याहत्तर हजार रुपये फक्त) | मशीनरी राखीव किंमत- रु **१,२५,८०० /-** (अक्षरी- एक लक्ष पंचेवीस हजार आठशे केवळ) |
| अनामत रक्कम | | |
| रु ५००० /- | रु ५०००/- | रु ५०००/- |

विक्री च्या शर्ती व अटी:-

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु. शंभर रु. फक्त)अधिक जीएसटी नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-लातूर शाखेतून प्राप्त करता येईल.

२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु. पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात /ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा- लातूर येथे दिनांक ०६/०७/२०२६ सायं. ०३.०० पर्यंत जमा कराव्यात.

३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा रक्कम रु. ५,०००/- (अक्षरी रु. पाच हजार रु फक्त) (प्रत्येकी) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.

४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक ०७/०७/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता बँकेच्या शाखा लातूर येथे उघडण्यात येतील.

५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मशीनरी विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.

६. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुसऱ्या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल. जर उर्वरित ७५ टक्के रक्कम विहित कालावधी जमा न करू शकल्यास आगोदर भरणा केलेली २५ टक्के रक्कम फॉरफिट करण्यात येईल यांची नोद घ्यावी.

७. सदर मशीनरीवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.

८. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्वगीत रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

९. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय, लातूर वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. क्र ७६६६५७७९०० पत्ता शाखा- लातूर मो.क्र. ९०४९९९८२७१ वर सुध्दा संपर्क साधता येईल.

१०. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.

११. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

१२. कुठल्याही करणाने मालमत्ता विक्रीस विलंब झाल्यास अथवा विक्री प्रक्रिया रद्द झाल्यास निविदा रक्कमेपोटी भरलेल्या रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज परतावा केला जाणार नाही.

स्थळ:- लातूर

दिनांक:-०४.०६.२०२६

अधिकृत अधिकारी (सेक्युअर्ड क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई
मोबाईल क्र. ७६६६५७७९००

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपच्या जिल्हा बैठकीत संकल्प से सिध्दी तक अभियानाचे नियोजन

## प्रदेश संयोजक तथा माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांची प्रमुख उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
केंद्रातील मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या तपपूर्ती निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या 'संकल्प से सिद्धी' अभियान, तसेच भारतीय जनता पार्टीच्या आगामी विविध संघटनात्मक व जनसंपर्क कार्यक्रमांच्या नियोजनासाठी हिंगोली जिल्हा भाजपची बैठक आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी शुक्रवारी संपन्न झाली.
या बैठकीला अभियानाचे प्रदेश संयोजक व माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, मराठवाडा संयोजक नितीन काळे, मराठवाडा सह-संयोजक राहुल लोणीकर, खासदार रामरावजी वडकुते, आमदार तान्हाजीराव मुटकुळे आणि जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्यासह माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, अतिश दांडेगावकर, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकूळे,जिल्हा उपाध्यक्ष मिलींद यंबल,जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे उपस्थित होते.
बैठकीत मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या १२ वर्षांच्या यशस्वी प्रवासाने देशाच्या विकासाला नवी दिशा दिली आहे. केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना, विकासकामे आणि जनहिताचे निर्णय समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आगामी काळात व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यावर भर दिला जाईल.या बैठकीत संकल्प से सिद्धी अभियान प्रभावीपणे राबविणे, पक्ष संघटन अधिक मजबूत करणे, प्रत्येक बूथस्तरापर्यंत अभियान पोहोचविणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि आगामी सर्व पक्षीय कार्यक्रम यशस्वी करणे या विविध विषयांवर सखोल चर्चा करून उपस्थित पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात श्यामकुमार डोंगरे रूजू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
औंढा पोलिस ठाण्यात बदली झालेल्या अधिकाऱ्यांना निरोप तसेच नव्याने रुजू झालेल्या अधिकाऱ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जी. एस. राहिरे यांची छत्रपती संभाजीनगर येथे बदली झाल्याने त्यांना यावेळी सत्कार करून निरोप देण्यात आला.
याच कार्यक्रमात औंढा पोलिस ठाण्याचे नुतन पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अय्युब शेख यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. पोलिस निरीक्षक डोंगरे म्हणाले, नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणारे आणि शांततेचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे यांचा सत्कार केला. यावेळी उप-स्थितानी आपले मनोगत व्यक्त केले.
या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, सपोनी भगत, उपनिरीक्षक अमोल इंगोले, उपनिरीक्षक शेख खूदुस, उप निरीक्षक पंजाब थिटे, सपोउपनिरीक्षक शेख आयूब, उपनिरीक्षक रोहिदास राठोड, रविकांत हरकाळ, संतोष पवार, अमोल चव्हाण, रमेश मस्के, जगदीप जाधव, किशोर पारीसकर, सईद सय्यद, वसंत चव्हाण, विजय कालवे, राजेश ठाकूर, सिद्दिकी, पंडित जगताप, विश्वनाथ ढोणे,बबन चव्हाण, विलास राठोड, विश्वनाथ मुकाडे ,संदीप चंद्रशेखर यांच्यासह पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, पत्रकार व लोकप्रतिनिधी या सत्कार कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रस्तावना व सूत्रसंचालन रविकांत हरकाळ तर आभार जगदीप जाधव यांनी मानले.

# हिंगोलीत कर्मचारी समाधान शिबीराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
शासन सेवेतील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रलंबित अडचणी तातडीने व कार्यक्षमतेने सोडविण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आज जिल्हाधिकारी कार्यालयात कर्मचारी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांनी सर्व विभाग प्रमुखांना कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अर्जांची माहिती कर्मचारी समाधान शिबीर विवरणपत्र 'अ' व 'ब' मध्ये तात्काळ भरून सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, विविध विभागांचे प्रमुख तसेच प्रतिनिधी उप-स्थित होते.
प्रशासनाच्या या उपक्रमांतर्गत तालुका स्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तालुका स्तरावरील अडचणी संबंधित तहसील कार्यालयात, जिल्हास्तरीयअडचणी जिल्हाधिकारी कार्यालयात तर विभागीय स्तरावरील अडचणी विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबिरांमध्ये स्वीकारण्यात येणार आहेत. यावेळी अर्जदार अधिकारी, कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिबिरास उपस्थित राहून आपल्या समस्या व अडचणी मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले. वेतन, पदोन्नती, विविध प्रकारच्या रजा, निवृत्तीवेतन, सेवापुस्तिका अद्ययावतीकरण यांसारख्या सेवाविषयक बाबींसाठी कर्मचाऱ्यांना अनेकदा विविध प्रशासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागतात. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने या शिबिरांच्या माध्यमातून अशा प्रकरणांचा एकाच ठिकाणी आणि निश्चित कालावधीत निपटारा करण्याची व्यवस्था निर्माण केली आहे.
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी हे शिबिर आयोजित करण्यात येणार असून, पहिला शुक्रवार शासकीय सुट्टीचा दिवस असल्यास त्यापूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी शिबिराचे आयोजन केले जाईल. तसेच सर्व कार्यालयांनी कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांची यादी अद्ययावत ठेवून ती संबंधित शिबिरामध्ये समाविष्ट करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांच्या तक्रारी व सेवाविषयक प्रकरणांचे वेळेत निवारण होऊन प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळणार आहे. सर्व विभाग प्रमुखांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश देण्यात आले असून, कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी दिली.

# सेनगाव तहसील कार्यालयाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

## प्रलंबीत प्रकरणे तत्काळ निकाली काढण्याचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज सेनगाव तहसील कार्यालयास भेट देऊन तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), मंडळ अधिकारी तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. महसूल विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित कामांची स्थिती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.
या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरवदे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी वनजमिनीच्या नोंदी, लँड बँक निर्मिती, ई-पीक पाहणी, आगामी जनगणना तयारी, रस्ते विकास कामे, सार्वजनिक वितरण व्यवस्था (पुरवठा विभाग), शासकीय इमारतींची बांधकामे तसेच विविध महसुली विषयांचा सखोल आढावा घेतला. प्रत्येक विभागाच्या कामकाजाची प्रगती, अडचणी आणि प्रलंबित बाबींची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.
यावेळी त्यांनी ई-पीक पाहणीचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देत शेतकऱ्यांच्या नोंदी अद्ययावत ठेवण्यावर भर दिला. वनजमिनीच्या नोंदींची शहानिशा करून संबंधित प्रकरणे नियमानुसार मार्गी लावावीत, तसेच लँड बँकसाठी आवश्यक माहिती संकलित करून अद्ययावत ठेवावी, असे निर्देश दिले. जनगणना पूर्वतयारीबाबत आवश्यक नियोजन, मनुष्यबळ व्यवस्थापन व माहिती संकलनाची प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच रस्ते व इमारत बांधकामांच्या कामांचा नियमित पाठपुरावा करून गुणवत्तापूर्ण व वेळेत कामे पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले.
सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमित व पारदर्शक पद्धतीने धान्य वितरण होईल याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद देऊन महसूल विभागाशी संबंधित प्रकरणांचा वेळेत निपटारा करावा, असेही त्यांनी सांगितले.
बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रलंबित कामे तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश देत, शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# १४ हजारांची लाच घेतांना ग्राम महसुल अधिकाऱ्यास पकडले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
सेनगाव तालुक्यातील खिल्लार येथभल तक्रारदाराची वडिलोपार्जित जमीनीचा फेरफार करून सातबाराला लावण्यासाठी १४ हजारांची लाच घेतांना ग्राम महसूल अधिकाऱ्यास लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने शुक्रवारी संध्याकाळी सातच्या सुमारास सेनगाव ते हिंगोली मार्गावर पुसेगाव पाटी येथे रंगेहाथ पकडले. याप्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील खिल्लार येथील एका तक्रारदाराच्या वडिलांच्या नावे असलेली जमीन हक्कसोड वाटणीतून तक्रारदाराच्या नावे आली होती. सदर जमिनीचा फेरफार करून सातबाराला नाव लावण्यासाठी त्यांनी तलाठी सज्जा येथे अर्ज दाखल केला होता. मात्र ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे याने २२ हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यावेळी रोडगे याने ८ हजार रूपयांची रक्कम घेतली. उर्वरित रक्कम देण्याचे ठरले होते.
याप्रकरणी तक्रारदाराने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. यावरून पडताळणी करण्यात आली. यावेळी रोडगे याने सेनगाव येथे १४ हजार रूपये आणून देण्याचे सांगितले. मात्र त्यानंतर त्याने सेनगाव ते हिंगोली मार्गावर पुसेगाव पाटी येथे थांबल्याचे सांगत तेथे येण्याचे तक्रारदारास सांगितले.
त्यावरून लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, सपो उपनि शेख शकील, विजय शुक्ला, जमादार भगवान मंडलीक, राजाराम फुफाटे, रवींद्र वरणे, गोविंद शिंदे, गजानन पवार, अमोल जाधव, शिवाजी वाघ, महिला पोलिस कर्मचारी योगिता अवचार यांच्या पथकाने रात्री सात वाजण्याच्या सुमारास पुसेगाव पाटी शिवारात सापळा रचला होता. यावेळी ग्राम महसुल अधिकारी रोडगे याला १४ हजारांची लाच घेतांना ला-चलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मोठ्या शिताफीने पकडले. याप्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**
सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु.) नांदेड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.
कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक सुनील राठोड यांच्या हस्ते शाळेच्या मैदानात विविध प्रकारची रोपे लावून करण्यात आली. झाडे लावा व झाडे जगवा हा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमात सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, सौ. रेशमा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड तसेच शाळेचे प्रशासक मारुती मेखाले सर्व शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सखुबाई वाबळे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**
भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे माजी कोषाध्यक्ष कै. ॲड. प्रल्हादराव उमरेकर यांच्या पत्नी सखुबाई प्रल्हादराव उमरेकर यांचे दि ६ जून रोजी पहाटे १.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या मुळगावी उमरा येथे सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# रिसाला बाजार ते अकोला बायपास रस्त्यावरील दुभाजकांमध्ये भाजपकडून वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**
शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी हिंगोली शहरातील रिसाला बाजार ते अकोला बायपासकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील दुभाजकामध्ये आ.तान्हाजीरावमुटकूळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.
वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने रिसाला बाजार ते अकोला बायपास या मुख्य रस्त्यावरील दुभाजकांचे सुशोभीकरण करून तेथे विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपणामुळे शहराच्या मुख्य रस्त्याला एक सुंदर आणि हिरवेगार स्वरूप प्राप्त होणार आहे.
याप्रसंगी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांच्यासह भाजप जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे आणि माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, कंत्राटदार मयुर कयाल, नारायण खेडेकर, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे,शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, नगरसेवक हमीद प्यारेवाले, पवन उपाध्ये,बाबाराव घुगे, मनोज शर्मा, उत्तमराव जगताप,अमित रुहाटिया, सचिन शिंदे यांची उपस्थिती होती. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून लावलेल्या झाडांना पाणी देण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी केवळ वृक्षारोपण न करता या झाडांचे पुढील काळात उत्तम संगोपन आणि जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच शहरातील नागरिकांनीही पर्यावरण रक्षणासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# १०१ सदस्य असतानाही काँग्रेसची माघार

## रामदास पाटलांसह अनेकांना 'लॉजीक' कळेना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुन -**

महायुतीची पत्रकार परीषद होताच शेवटच्या एका तासात केवळ १३ सदस्य असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाला नांदेड विधानपरीषदेची जागा सोडण्यात आली आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे ९२ सदस्य होते त्यामुळे जागा सोडण्याचे कारण काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे तर दुसरीकडे निवडणुकीतुन माघार घ्यावी लागल्याने रामदास पाटील सुमठाणकर देखील नाराज झाले आहेत.

काँग्रेसचे ९२ नगरसेवक तसेच शिवसेनेचे १३ सदस्य आणि वंचित बहुजन आघाडीने काँग्रेसचे उमेदवार म्हणजेच रामदास पाटील सुमठाणकर यांना पाठिंबा दिला होता. परंतु उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी अचानकपणे ही जागा शिवसेनेला सोडण्यात आली. खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. परंतु अचानकपणे काँग्रेसने माधार घेतल्याने रामदास पाटील सुमठाणकर यांच्या भोवती संशयाचे वारे फिरत असताना काँग्रेस पक्षश्रेष्ठी हर्षवर्धन सपकाळ यांनी २ खासदार, ३ जिल्हाध्यक्ष आणि १८ नगरसेवक, पदाधिकारी नगराध्यक्ष यांच्या समोर स्पीकरवर आदेश दिल्यावर, सर्वासमक्ष उमेदवारी मागे घेतली असल्याचे स्पष्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या.



भाजप पक्षाचा राजीनामा देवून त्याच्याच उमेदवाराविरुद्ध मी हिंगोली विधानसभा निवडणुक लढविली. कोणत्या चौकशी नोटीसची कधी कसली भीती नाही. सब किताब खुली आहे. माझ्याकडे जनशक्ती संघटन शिवाय काहीच नाही गमवायला. सर्व ओढा सत्तकडे जात असताना प्रवाहविरुद्ध काँग्रेसमध्ये जाऊन देगलूर नगरपालिका सक्षमपणे लढविली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि जिल्ह्यात सर्व टोळ्या निवडणूक एकतर्फी करण्यासाठी प्रयत्न करत होते, असे असताना आणि समोर खड्डा आहे, मरण आहे असे दिसत असताना जिगर ठेवून, अगोदर पूर्ण विधानपरिषद क्षेत्र फिरून, मतदार भेटी, बांधणी करून काँग्रेस पक्ष टिकवण्यासाठी मी मैदानात उतरलो आणि सर्वांना पळता भुई थोडी केली,

शेवटच्या एक तासात जुगाड लावून तिकीट कापले गेले. याला राजकीय सर्व घटक कारणीभूत होते. नक्कीच म्हटले जाते ना युद्धात जिंकले ते तहात हरलो. मला तहाचा अनुभव नसल्याने तह करणे जमले नाही, अशी खंत रामदास पाटील सुमठाणकर यांनी व्यक्त करत प्रवाहाविरुद्ध वाहण्याची धमक आणि जिगर बाळगून असणारा मी कार्यकर्ता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा परिषदेत शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुन -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदत आज शिवस्वराज्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शिवरायांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि जनहितवादी प्रशासन व्यवस्थेचा आदर्श घेऊन शासनाच्या विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कटिबद्ध राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच गुढीपूजन व गुढी उभारणी करून शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. श्री चैतन्य इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी राहुल कर्डिले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आदर्श प्रशासन उभे केले. शेतकऱ्यांना मदत, सिंचन व्यवस्थेचा विकास, न्याय्य कारभार आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजन यामुळे त्यांचे राज्य लोकाभिमुख ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपल्या कामातून शिवरायांच्या प्रशासनाची मूल्ये जपली पाहिजेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमात शाहीर रमेश गिरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे व शाहिरी सादर करून उपस्थितांना शिवचरित्राची प्रेरणादायी आठवण करून दिली. उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक आणि जिल्हा परिषदेचा लोगो असलेला स्मृतिचिन्ह कप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तुबाकले यांनी केले. सूत्रसंचालन पद्माकर कुळकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले, तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी मानले. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. एस. बी. खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करावी- मेघना कावली**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची संकल्पना ही लोककल्याण, न्याय, पारदर्शक प्रशासन, स्त्री सन्मान, पर्यावरण संवर्धन या मूल्यांवर आधारित होती, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले. आजच्या प्रशासन व्यवस्थेतही या मूल्यांचे महत्त्व कायम असून प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडणे हीच शिवरायांना खरी आदरांजली- शहाजी उमाप**

अनेक संकटांचा सामना करत छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी आणि न्यायाधिष्ठित राज्य उभे केले. आपल्या प्रजेवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी ते सदैव जागरूक राहिले. शासनाच्या माध्यमातून आपल्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने पार पाडणे हीच शिवरायांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.

### अवैध रेती वाहतुकीवर सोनखेड पोलीसांची कारवाई

**सोनखेड** -बेटसांगवी येथून अवैद्य रेतीची वाहतूक करणाऱ्या चार हायवावर ३ जून रोजीच्या पहाटे कार्यवाही करण्यात आली. सोनखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भागवत नागरगोजे यांनी २ जूनच्या पहाटे पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर प्रथमतः त्यांनी ३ जून रोजी सोनखेड पोलीस ठाणे हद्दीतील गोदावरी बेटसांगवी या गोदापात्रात फेरफटका मारून अवैद्य रेती उपसा व वाहतूक प्रकरणी आढावा घेतला आणि पाळत ठेवून ३ जूनच्या मध्यरात्रीनंतर बेटसांगवी ते दगडगाव रस्त्यावर अवैद्य गौण खनिज (रेतिची) वाहतूक करणारी एक हायवा पकडली तर घटनास्थळावरून तीन पळून जाण्यात यशस्वी झाल्या होत्या परंतु पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल्यानंतर त्या पकडण्यात आल्या आणि त्यानंतर मारुती कदम,संतोष राठोड,सुनील राठोड व सचिन राठोड यांच्यासह चालक-मालकावर कलम ३०३ (२) प्रमाणे अवैद्य रेतीची चोरटी वाहतूक केल्याप्रकरणी सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून त्याच्याकडून १ कोटी ८० लक्ष रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर पुढील तपास पो.हे. काँ.विश्वनाथ हंबर्डे व बीट जमादार गंगाधर शिंदे हे करीत आहे. विशेष म्हणजे यातील काही रेती हायावा मालकांनी सकाळीच नवीन सपोनि नागरगोजे यांचा शाल हार घालुन सत्कार केला होता पण परंतु सत्कार केला तरी अवैध धंदे करणाऱ्यावर कार्यवाही करणारच असे आपल्या कृतीतुन दाखवून दिले.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**नवीन नांदेड** -जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ जुन २०२६ रोजी सहयोग सेवाभावी संस्था आणि इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने झाडे लावा, झाडे जगवा या सामाजिक संदेशावर आधारित भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाची जनजागृती करणे, विद्यार्थ्यांमध्ये वृक्षांप्रती आत्मीयता निर्माण करणे आणि हरित भविष्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सहयोग सेवाभावी संस्था व इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव आणि नांदेड भाजपा दक्षिणचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विशद केले. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी सांगितले की, वृक्ष हे केवळ निसर्गाचे अलंकार नसून मानवी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यावर मात करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. आजचा युवक हा देशाचा भविष्यकाळ आहे आणि पर्यावरण रक्षणासाठी युवकांनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्यास हरित आणि समृद्ध भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. या कार्यक्रमास डॉ. नवघरे (प्राचार्य, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी), डॉ. एस. बी. जाधव, श्री. पवन सागरुळे, कु. खान, कु. भोसले, सौ. गजेवार, कु. पालिमकर, सौ. निलकंठे तसेच राष्ट्रीय सेवा योजना (छडड) समन्वयक श्री. राज कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच शिवानंद बारसे (संचालक, TCS iON Digital Zone), डॉ. अग्रवाल (प्राचार्य, इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी), डॉ. भार्गवी (इंदिरा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी), डॉ. गझाला खान (संचालक, इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस) तसेच श्री. विक्रम ढोणे (प्राचार्य, इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल) संतोष पाटील जानापुरीकर यांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमास पाठिंबा दर्शविला.दरम्यान विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्वतः वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. यावेळी सर्वांनी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि हरित परिसर निर्मितीसाठी योगदान देण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

### एआय-सारथी प्रकल्पाचा शुभारंभ

**नांदेड** -जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक डिजिटल अध्यापन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या एआय-सारथी : डिजिटल अध्यापन व अनुभवाधारित शिक्षणासाठी जिल्हा परिषद शिक्षकांचे क्षमता संवर्धन' या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्कमाचा आज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे शुभारंभ झाला. विद्यापीठाच्या गणितशास्त्र संकुल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा परिषद, नांदेड यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी विद्यापीठ आणि जिल्हा परिषद, नांदेड यांच्यात शालेय शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. उद्घाटन कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रमुख पाहुण्या मेघना कावली, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील तसेच आयआयएल संचालक डॉ. शैलेश वाधेर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी एआय-सारथी प्रकल्पाची संकल्पना आणि उद्दिष्टे स्पष्ट केली.

# हडकोत शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ६ जुन -**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानमित्त हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला. उपस्थितांना यावेळी साखर वाटप आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी सिडको हडको परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत राज्याभिषेक सोहळा पार पडला.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णकाळ आणि महत्वाचा प्रसंग. ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर हा ऐतिहासिक सोहळा पार पडला. या राज्याभिषेकामुळे मुघल आणि इतर परकीय सत्तेचा अधीन असलेल्या भारतात एक स्वतंत्र व सार्वभौम हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. या ऐतिहासिक दिनानिमित्त हडको येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सिडको नगरसेवक संजय पाटील घोगरे , वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, सतीश बस्वदे तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. नरेश रायेवार, डॉ. अशोक कलंत्री, डॉ. विजयानंद भोंग, डॉ. अशोक भिसे, भगवान ताटे, साहेबराव गाडे, जयवंत काळे, संजय इंगेवाड, आनंदराव गायकवाड, संदीप कदम, प्रमोद मैड, देविदास बस्वदे, धीरज स्वामी, बापू पाटील, शिराळे देवराव, साहेबराव मोरे,गजानन शिंदे, विनोद कांचनगिरे, सुदर्शन कांचनगिरे यांच्यासह व्हाईस ऑफ मीडिया दक्षिण नांदेड पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे, उपाध्यक्ष सूर्यकुमार यन्नावार, सचिव शिवाजी राजुरकर, कोषाध्यक्ष दिगंबर शिंदे (डिगा पाटील), सहसचिव सुरेश आंबटवार यांची उपस्थिती होती या कार्यक्रम सोहळ्याचे आयोजन एकवृत्त चॅनलचे संपादक दिगंबर शिंदे यांनी केले होते.

# निर्दयी जनावर वाहतुकीवर रामतीर्थ पोलिसांचा दणका; पिकअपसह सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ६ जुन -**

नायगांव तालुक्यातील नरसी परिसरात गोवंशीय जनावरांची अमानुष व निर्दयी पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनावर रामतीर्थ पोलिसांनी कारवाई करत पिकअप वाहनासह ५ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ५ जून रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास नरसी येथील माणिक लोहगांवे यांच्या घरासमोरील नायगावदेगलूर मार्गावर ही कारवाई करण्यात आली. वाहन क्रमांक एमएच २६ सीएच १४९८ या पिकअप वाहनामध्ये दोन गिर गायी व एक गोरे जनावर यांना अत्यंत आखूड



दोरीने बांधून, त्यांना वेदना व यातना होतील अशा अवस्थेत वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल मुक्तार हैदरसाब शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल धोडींबा सूर्यवंशी (वय २३, रा. जुनेगाव नरसी, ता. नायगाव) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन गोवंशीय जनावरे व संबंधित पिकअप वाहन असा एकूण ५ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी ताब्यात मिळून आला असून पुढील तपास पोहेकॉ/२५४२ सोनकांबळे हे करीत आहेत.

सदर कारवाई प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्राण्यांवरील क्रूरतेविरोधात रामतीर्थ पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे परिसरातून स्वागत होत असून अशा बेकायदा व अमानुष कृत्यांना आळा बसण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जुन -**

येथील सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर मनपा कामगार- कर्मचारी युनियन (रौप्य महोत्सवी वर्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने स्मृतीशेष शंकरराव सावेकर भव्य मंचावर फुले- शाहू- आंबेडकर व साठे प्रेरणेचे २१ वे आंबेडकरवादी साहित्य संमेलन रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता शहरातील डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आले आहे.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रख्यात लेखक, प्रखर वक्ते, संपादक संजय आवटे, उद्घाटकपदी एस.सी./एस.टी. आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, ज्येष्ठ नाटककार दत्ता भगत, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रविण पाटील, सुप्रसिद्ध साहित्यिक विलास सिंदगीकर, लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे, ओबीसी नेते इंजि. लक्ष्मण लिंगापूरे, यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवयित्री अर्चना खोब्रागडे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी लेखिका रुपाली वागरे यांचा शब्दसाज लेख संग्रह, मारोती कदम यांचा संवाद, सुजाता पोपुलवार यांचे अभंग रमाई या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

# भगवंतांचे चिंतन करा, संसाराची चिंता प्रमेश्वर करेल : चंद्रशेखर महाराज

**तभा वृतसेवा**
**नायगाव , दि. ६ जुन -**

अधिक मासाच्या पावन पर्वाच्या पूर्वसंध्येला नरसी येथील भगवान बालाजी मंदिर परिसरात सद्गुरू भक्ती, अध्यात्म आणि गुरुकृतज्ञतेचा भव्य भावस्पर्शी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सद्गुरू ह.भ.प.गाथा मूर्ती चंद्रशेखरजी महाराज देगलूरकर यांचे निष्ठावंत शिष्य बालाजी गणेशराव कोटूरवार मुगांवकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या गुरुपूजन, गुरु उपासना, प्रवचन व महाप्रसाद कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उपस्थित राहून गुरुकृपेचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सद्गुरू ह.भ.प. गाथामूर्ती चंद्रशेखरजी महाराज देगलूरकर यांच्या प्रेरणादायी प्रवचनाने झाली. आपल्या अमृतमय वाणीतून मार्गदर्शन करताना महाराज म्हणाले की, मानवाने सुखाच्या प्रपंचाची अति चिंता न करता भगवंताचे सतत चिंतन करावे. वैवाहिक जीवनातही ईश्वरभक्तीचा आधार घेतल्यास



परमेश्वर स्वतः भक्ताच्या संसाराची चिंता करतो. भगवंतावर दृढ श्रद्धा आणि विश्वास ठेवणाऱ्यांचे जीवन सदैव सुख, समाधान आणि आनंदाने परिपूर्ण होते. यावेळी महाराजांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून ईश्वरभक्तीचे महत्त्व पटवून देत उपस्थित भाविकांना अध्यात्माचा अमूल्य संदेश दिला.

प्रवचनाच्या समाप्तीनंतर महाराजांचे शिष्य बालाजी गणेश कोटूरवार व त्यांच्या धर्मपत्नी सौ. अनुराधा बालाजी कोटूरवार यांच्या हस्ते सद्गुरूंचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित भाविकांनी गुरुभक्तीचा अद्वितीय आविष्कार अनुभवला.

या सोहळ्यास मुगाव नगरीचे सरपंच गंगाजी पाटील मुगावकर, नरसीचे सरपंच गजानन शिवाजी भिलवंडे, उबाठा गटाचे नायगाव तालुकाप्रमुख रवींद्र भिलवंडे, प्रसिद्ध उद्योगपती राजेश भिलवंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य माणिक लोहगावे, माजी उपसरपंच मोहनराव भिलवंडे, आनंदराव सूर्यवंशी, शाम चोडे, अनिल सावकार, एकनाथ मुनगीलवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा सोहळा भक्तिमय वातावरणात यशस्वी केला. संपूर्ण मंदिर परिसर हरिनामाच्या गजराने, भजन-कीर्तनाने आणि गुरुभक्तीच्या उत्साहाने भारावून गेला होता.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजीत कोटूरवार, त्र्यंबक मुनगीलवार, लक्ष्मीकांत पांपटवार, बालाजी कवटीकवार, रविकुमार, गंगाजी पाटील मुगांवकर, भगवान पाटील मुगावकर, श्रीराम सावकार मेडेवार, मनोज सावकार आरगुलवार, रमेश पद्मवार, बालाजी चिंतावार , शिवाजी मरवाळीकर साईनाथ दुस्सेवारसह आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बाळासाहेब पांडे यांनी केले, तर सद्गुरू चंद्रशेखर महाराज देगलूरकर सेवा मंडळाचे सदस्य बालाजी गणेशराव कोटूरवार मुगांवकरांनी उपस्थितांचे आभार मानले.

अधिक मासाच्या पावन पर्वात संपन्न झालेला हा गुरु कृतज्ञतेचा सोहळा भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांचा अनमोल संगम ठरला. सद्गुरूंच्या अमृतवाणीतून लाभलेल्या अध्यात्मिक मार्गदर्शनाने आणि गुरुपूजनाच्या दिव्य वातावरणाने उपस्थित भाविकांच्या मनावर अविस्मरणीय छाप उमटविली.

ार्यालयाचे श्री.डी.एस.गायकवाड जिल्हा व्यवस्थापक यांचे हास्ते सत्कार करण्यात आला.

उपस्थित सर्व कर्मचारी वृंद.सुमीत सरगर ,शेख फरीद,विशाल पवार,सदाम सयद व लो.अणणाभाउ साठे विकास महामंडळाचे, श्रीमती.खुणे मॅडम,श्री.डोगरे ,संत रोहीदास चर्मकार महामंडळाचे, सो.कांबळे मॅडम व दिव्यंग महामंडळाचे श्री.राठोड.व परभणी जिल्हा कार्यालयाचे श्री.साळवी व श्री.बरे इ.सर्व महामंडळाचे कर्मचाऱ्यांनी सत्कार केले.तसेच मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष पी . जी .गिलचे ( सर ) शिक्षक वामन गिलचे , सौ ललिता गिलचे , ' सौ विद्यादेवि वामन गिलचे ,सौ पुज्यादेवि गिलचे , सौ आशा ज्ञानोबाराव अंधोरीकर , धम्मशिला विलासराव होंडाळकर ,मनेष गिलचे , आकाश गिलचे , गौरव विलास होंडाळकर हे परीवारासह अभिनंदन केले आहेत .

## शेतकऱ्यांना लास्ट-माईल मोबाईल पशुवैद्यकीय सेवा

अहिल्यानगर- भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पशुधन परिसंस्था बळकट करण्यासाठी दुग्ध उत्पादक शेतकरी आणि भागीदारांसोबत केलेल्या कार्यावर आधारित, कारगिलने आज सिंजेंटा फाउंडेशन इंडिया आणि डिजिटल ग्रीन इंडिया यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात एकात्मिक दुग्धविकास उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली. मुंबई मंत्रालयात या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, सन्माननीय अतिथी, आणि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव श्री एन. रामस्वामी यांच्या हस्ते, अहिल्यानगरमधील भागीदार आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष सहभागासह झाले. कारगिलच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) आणि शाश्वततेच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आगामी दोन वर्षांत २.३ कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह, हा उपक्रम प्रथम अहिल्यानगर जिल्ह्यात राबविला जाईल (आणि त्यानंतर इतर जिल्ह्यांत विस्तार केला जाईल).

## धाराशिवला गतिमान ठेवण्याचे कार्य

**धाराशिव,महाराष्ट्र, 03 जून 2026:** फॉर्च्यून ग्लोबल 500 कंपनी आणि महारत्न पीएसयू असलेली भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आपल्या मजबूत पुरवठा आणि वितरण नेटवर्कच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात अखंड इंधन उपलब्धता सुनिश्चित करत आहे. सूर्योदय होण्यापूर्वीच जिल्ह्यातील बीपीसीएलच्या रिटेल आऊटलेट्सवर इंधन टँकर्स पोहोचण्यास सुरुवात होते. धाराशिव जागा होत असताना कापणीच्या कामासाठी तयारी करणारे शेतकरी, अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करणारे परिवहन व्यावसायिक, स्थानिक व्यावसायिक तसेच दैनंदिन प्रवासी इंधन केंद्रांवर येऊ लागतात. मात्र, या सर्वांच्या मागे एक मोठी यंत्रणा आधीपासूनच कार्यरत असते.

## 'द ओडिसी' या चित्रपटासाठी बुकिंग ८ रोजी सुरू

**मुंबई :** क्रिस्टोफर नोलन यांच्या बहुप्रतिक्षित 'द ओडिसी' या चित्रपटाची वाट पाहणाऱ्या भारतीय प्रेक्षकांसाठी आनंदाची बातमी. या चित्रपटासाठी आयमॅक्स ॲडव्हान्स बुकिंग भारतात ८ जून रोजी सुरू होणार आहे. यामुळे, भारतीय प्रेक्षक चित्रपटासाठी आपल्या पसंतीच्या जागा आगाऊ बुक करणाऱ्या जगातील पहिल्या काही प्रेक्षकांपैकी असतील. हा संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रित केलेला जगातील पहिला चित्रपट आहे. हा चित्रपट भारतासह जगभरातील चित्रपटगृहांमध्ये १७ जुलै, २०२६ रोजी प्रदर्शित होईल. ऑस्कर-विजेते दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. होमरच्या प्रसिद्ध महाकाव्यावर आधारित, या चित्रपटाची मोठ्या पडद्यासाठी पुनर्कल्पना करण्यात आली आहे. ही कथा इथाकाचा राजा ओडिसियसची आहे, जो ट्रोजन युद्ध संपल्यानंतर घरी परतण्यासाठी एका लांब आणि धोकादायक प्रवासाला निघतो.

## अहिल्यानगरमधील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना लास्ट-माईल मोबाईल पशुवैद्यकीय सेवा

अहिल्यानगर- भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पशुधन परिसंस्था बळकट करण्यासाठी दुग्ध उत्पादक शेतकरी आणि भागीदारांसोबत केलेल्या कार्यावर आधारित, कारगिलने आज सिंजेंटा फाउंडेशन इंडिया आणि डिजिटल ग्रीन इंडिया यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात एकात्मिक दुग्धविकास उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली. मुंबई मंत्रालयात या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, सन्माननीय अतिथी, आणि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव श्री एन. रामस्वामी यांच्या हस्ते, अहिल्यानगरमधील भागीदार आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष सहभागासह झाले. कारगिलच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) आणि शाश्वततेच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आगामी दोन वर्षांत २.३ कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह, हा उपक्रम प्रथम अहिल्यानगर जिल्ह्यात राबविला जाईल (आणि त्यानंतर इतर जिल्ह्यांत विस्तार केला जाईल). अहिल्यानगरमधील राहुरी, राहाता आणि श्रीरामपूर येथील २६ गावांमध्ये पशु आरोग्य मित्र (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून ३,००० हून अधिक शेतकऱ्यांच्या पशुंचे आरोग्य, दुग्ध उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य सुधारणे हा यामागचा उद्देश आहे.

## मोटोरोलाने एज 70 प्रो प्लस लॉन्च केला

**मुंबई :** मोटोरोला या मोबाईल तंत्रज्ञान व नाविन्यपूर्ण संशोधनातील जागतिक अग्रणी आणि भारतातील अग्रगण्य एआय स्मार्टफोन ब्रँडने आज 2026 मधील सर्वात स्टायलिश आणि ऑल-राऊंडर फोन मोटोरोलान एज 70 प्रो प्लस लाँच केला आहे. कोणत्याही तडजोडीशिवाय सर्वोत्कृष्ट फ्लॅगशिप अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेला हा स्मार्टफोन व्यावसायिक दर्जाची फोटोग्राफी, आलिशान आणि वैशिष्ट्यपूर्ण फिनिश, विलोभनीय मनोरंजन, पुढच्या पिढीचे मोटो एआय अनुभव आणि फ्लॅगशिप-स्तरीय कामगिरी यांचे उत्तम संयोजन देतो. या डिवाईसमध्ये 50 मेगापिक्सलचा क्वाड प्रो-ग्रेड कॅमेरा सिस्टम आहे, ज्याचे नेतृत्व मोटो एआयसह प्रगत सोनी एलवायटीआयए™ 710 कॅमेरा करतो, जो कमी प्रकाशातही उत्कृष्ट फोटोग्राफी देतो. यासोबत 50x एआय सुपर झूम प्रो क्षमता असलेला 50 मेगापिक्सल 3.5x पेरिस्कोप टेलिफोटो कॅमेरा, 50 मेगापिक्सलचा अल्ट्रा-वाइड + मॅक्रो व्हिजन कॅमेरा आणि ऑटो फोकससह 50 मेगापिक्सल क्वाड पिक्सेल सेल्फी कॅमेरा यात देण्यात आला आहे. प्रगत ऑन-डिवाईस एआय क्षमतांसह मीडियाटेक डायमेन्सिटी 8500 एक्सट्रीम प्रोसेसरद्वारे समर्थित मोटोरोला एज 70 प्रो प्लस पँटोन™ क्युरेटेड रंगांमध्ये सॅटिन-लक्स, स्कल्प्टेड वूड आणि ट्वील इन्स्पायर्ड फिनिशसह कलेक्शन्स बाय मोटोरोला देखील सादर करत आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरतर्फे 'पर्यावरण महिना 2026' चे आयोजन

**बेंगळुरू, 04 जून 2026:** टोयोटा किर्लोस्कर मोटरने 'पर्यावरण महिना 2026' ची सुरुवात केली असून, यावर्षीची थीम आहे – "संसाधन पुनर्वापराद्वारे हवामान-सकारात्मक कंपनीकडे वाटचाल". या उपक्रमाद्वारे कंपनी आपल्या कार्यपद्धती आणि भागधारक परिसंस्थेमध्ये शाश्वत पद्धती अधिक बळकट करण्याच्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिपादन करत आहे. टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज 2050 आणि इतर शाश्वतता उद्दिष्टांपासून प्रेरित होऊन, हा उपक्रम पुरवठादार, डीलर्स, लॉजिस्टिक्स भागीदार, कर्मचारी आणि समुदायांना संसाधन पुनर्वापर, कचरा कमी करणे आणि हवामान-सकारात्मक कृतींसाठी एकत्र आणतो.

## वर्ध्यातील धोत्रा येथे रंगला शक्तीपीठ संवाद यात्रेचा कार्यक्रम

**मुंबई, ४ मे २०२६:** महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला नवे बळ देणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य शक्तीपीठ महामार्ग' प्रकल्पाच्या उभारणीला आता प्रत्यक्ष गती मिळू लागली असून या महत्त्वाकांक्षी महामार्गाची सुरुवात वर्धा जिल्ह्यातून होत असल्याने विदर्भातील विकासाच्या आशा अधिक दृढ झाल्या आहेत. राज्यातील प्रमुख धार्मिक, आर्थिक आणि औद्योगिक केंद्रांना जोडणारा हा महामार्ग भविष्यातील प्रगतीचा नवा मार्ग ठरणार असून, या प्रकल्पाबाबत जनजागृती आणि संवाद साधण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)कडून 'शक्तीपीठ संवाद यात्रा' सुरू करण्यात आली आहे. या यात्रेचा पहिला टप्पा वर्धा जिल्ह्यातील धोत्रा येथे अलीकडेच उत्साहात पार पडला. ज्येष्ठ अभिनेते आणि सूत्रसंचालक भारत गणेशपुरे यांनी या संवाद कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

# श्री क्षेत्र वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गढी वर 352 वा शिवराज्याभिषेक सोहळा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

### राजेंद्र पवार यांचा पुढाकार

तभा वृत्तसेवा



खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे ६ जून स्वराज्य संकल्प भूमी पितृ तीर्थ श्रीक्षेत्र वेरूळ येथे शहाजीराजे भोसले स्मारकासमोर ५१ विविध क्षेत्रातील मान्यवर जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव राज्याभिषेक सोहळा श्री क्षेत्र वेरूळ येथे मालोजी राजे भोसले गडीवर सकाळी आठ ते दहा वाजेच्या दरम्यान प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या पुढाकारातून संलग्न तिसऱ्या वर्षी मोठ्या उत्साहात संपन्न झाला

या सोहळ्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हा व महाराष्ट्र मधील ५१ मान्यवरांची सह पत्नीक उपस्थिती होती त्यांच्या शुभ असते छत्रपती शिवरायांच्या ५१ मूर्तींचा सामूहिक अभिषेक संपन्न संपन्न झाला यावर्षी अतिशय नियोजनबद्ध या सोहळ्याचे आयोजन केलेले होते हे तिसरे वर्ष असून यावर्षी सामाजिक वैद्यकीय शैक्षणिक उद्योग विधीतज्ञ आध्यात्मिक क्षेत्रातील श्री विवेकानंद महाराज नाथ आश्रमाचे अक्का महाराज सह राजकीय क्षेत्रातील महत्त्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी उपस्थित होते प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल सावे जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील संभाजीनगर शहराचे महापौर समीर राजूरकर यांनी मुख्य व्यासपीठावर शिव मूर्तीला अभिषेक केला निवडक ५१ मान्यवरांमध्ये नगरसेवक विश्वनाथ स्वामी नगरसेवक माधुरीताई आदमंत नगरसेवक शिवाजीराव दांडगे जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे जिल्हा परिषद सदस्य सौ रेखा प्रकाश चव्हाण जिल्हा परिषद सदस्य सौ प्रतीक्षा विकास कापसे खुलताबाद पंचायत समिती सभापती सौ सुनीता संजय पाटील खंडागळे उपसभापती सौ मंदा बद्रीनाथ वाकळे पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे नारायण बर्डे खुलताबाद नगरसेवक परसराम पाटील बारगळ कैलास पाटील बारगळ महानगरपालिका प्रभाग क्रमांक २५ . नगरसेवक सौ प्रियंका दीपक कोतकर रामेश्वर कोरडे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ यांची उपस्थिती होती या

वरील प्रमुख मान्यवरांना महाराष्ट्रातील सर्व शिवभक्ताच्या वतीने स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी लिखित स्वरूपामध्ये निवेदन दिले आहे की या ऐतिहासिक जागेचा विकास होण्यासाठी मुख्यमंत्री महोदय कडे बैठक लावावी मालोजीराजे भोसले गडीच्या संदर्भात चार प्रमुख मागण्या यावेळी केले असून या जागेचं महत्त्व फक्त स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जन्मभूमी असल्यामुळे पितृ तीर्थ म्हणून या घडीला घोषित करावे दुसरी मागणी जागतिक दर्जाचे स्मारक होण्यासाठी ४०० ते ५०० कोटी रुपये तरतूद करून या पवित्र पावन भूमीचा विकास करावा तिसरी प्रमुख मागणी सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गाला स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले महामार्ग असे नाव देण्यात यावे कारण याच मार्गाने शहाजीराजे भोसले कर्नाटक येथे गेले असून त्यांची समाधी उदगिरी कर्नाटक येथे आहे चौथी मागणी वेरूळ येथील मुख्य चौक मालोजीराजे भोसले यांच्या नावाने असून कुंभमेळा च्या अगोदर या चौकाचे शुभिकरण होणे गरजेचे आहे कारण भारतभरातून कुंभमेळ्याच्या पर्वकाळावर करोडो लोक वेगवेगळ्या नगरीत येतील त्यांच्यापर्यंत हा इतिहास योग्य पद्धतीने जाईल मागण्या माननीय मंत्री महोदय अतुल दिसावे साहेब व पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्याकडे गेले असून दोन्ही मान्यवरांनी या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री महोदयांची बैठक लावून असे आश्वासन हजारो शिवभक्तांना शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने शुभेच्छा पर भाषणामध्ये आश्वासित केले जाहीर केल्याप्रमाणे मोठ्या थाटामाटा मध्ये संपन्न झालेला हा सोहळा यामध्ये निमंत्रित ५१ मान्यवरांना शिवमुर्ती अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर भेट म्हणून देण्यात आल्या डोळ्याचं भव्य स्वरूप बघून मान्यवर व निमंत्रितांनी प्रतिष्ठानचे कौतुक केले व प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या चरणापाशी वेरूळला सातत्याने घेत असल्यामुळे आलेल्या सर्व मान्यवरांनी विशेष कौतुक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार याचे केले. हा सोळा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे राजू चव्हाण गणपत मस्के मनोहर गावडे संदीप मोडके विष्णू पवार कडूबा जगताप नितीन काळे अनिल पाटील मिसाळ सागर पाटील मतकर व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले अशी माहिती आयोजन समितीचे राजेंद्र पवार यांनी दिले

## एमजीएममध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

तभा वृत्तसेवा



छत्रपती संभाजीनगर, महात्मा गांधी मिशन विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिंतनगाह परिसर येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'इन्स्पायर्ड बाय नेचर. फॉर क्लायमेट. फॉर अवर फ्यूचर' ही यावर्षीची पर्यावरण दिनाची थीम आहे. आज या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांनी 'पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैली'चा संदेश देत सर्वांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास डॉ.आर. आर.देशपांडे, एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, एमेरिटस प्राध्यापक डॉ. के. एम. जाधव, विभागप्रमुख डॉ.विजया प्रधान, प्रविण देशमुख, सर्व संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, विभागप्रमुख, विद्यार्थी व सर्व सबंधित उपस्थित होते.

आज केलेले वृक्षारोपण हे 'सिटी फार्मिंग' या शहरी भागातील सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन आणि हरित पर्यावरण निर्मिती यांची सांगड घालणारी अभिनव संकल्पना आहे. या पद्धतीत घरगुती जैविक कचऱ्यापासून कंपोस्ट तयार करून त्याच ड्रममध्ये विविध प्रकारची झाडे, फुले, औषधी वनस्पती आणि भाजीपाला लागवड केली जाते. यामुळे कचऱ्याचे पुनर्वापर, प्रदूषण कमी करणे, कार्बन शोषण वाढवणे आणि शहरांमध्ये हिरवळ निर्माण करणे शक्य होते. सिटी फार्मिंगमुळे स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत पर्यावरण निर्मितीस हातभार लागतो.

एमजीएम विद्यापीठ राबवत असलेले उपक्रम हे संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत असून हवामान बदलाच्या परिणामांना कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी कार्यरत आहेत. वृक्षारोपण, नदी संवर्धन आणि स्वच्छता मोहिमांद्वारे आम्ही हरित, स्वच्छ आणि शाश्वत भविष्यासाठी योगदान देत आहोत.

नदी संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही केवळ पर्यावरणाची गरज नसून आपल्या भविष्यासाठीची सामूहिक जबाबदारी आहे. नदी स्वच्छता मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग, नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी सर्वांनी समूहिकपणे प्रयत्न करणे तसेच कचऱ्याचे पुनर्वापराद्वारे सौंदर्यात रूपांतर करत डस्टबिनपासून आकर्षक फुलदाण्या तयार करणे अशा उपक्रमांद्वारे आपण पर्यावरण संवर्धनाला हातभार लावत आहोत. शहराचा एक जबाबदार घटक म्हणून आम्ही या उपक्रमाचा अभिमानाने भाग आहोत आणि स्वच्छ, सुंदर व शाश्वत भविष्यासाठी कटिबद्ध आहोत, असा संदेश मान्यवरांनी यावेळी दिला.

## बालानगर सोसायटी तर्फे खत वाटपास सुरुवात



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०६ :-** पैठण तालुक्यातील बालानगर विविध विकास सोसायटी तर्फे सहाय्यक निबंधक नवथर,एमसी डीसीचे शिंदे यांच्या हस्ते गावांतील शेतकऱ्यांसाठी खत वाटपास नुकतीच सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रविण पाटील गोर्डे चेअरमन, तालेब भाई व्हॉइस चेअरमन,तांगडे सचिव,महंमद भाई,अशोक काकडे,योगेश तांबे,उमेश ढोले, सर्व संचालक मंडळ तसेच सभासद शेतकरी मन्नान भाई, ज्ञानेश्वर वाघ राम गोर्डे पंडित औसारे तंत्र स्नेही, भीमराव गोर्डे गणेश गोर्डे, अफसर भाई,मच्छिन्द्र घोंगडे, मुस्ताकभाई,ताकवाले मामा,चौधरी रामेश्वर,मुस्ताक उस्मान,शिपाई निरपगारे,सह मोठया प्रमाणात, सभासद शेतकरी उपस्थित होते.

## सोयगाव; खत विक्रीतील नव्या ऑनलाइन प्रणालीचे पोस्टर अनावरण



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव, दि.६ जून :** शेतकऱ्यांना खत वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने सुरू केलेल्या "Framework for Fertilizer Sale (FFS)" या ऑनलाइन प्रणालीबाबत जनजागृती करण्यासाठी पंचायत समिती सोयगाव येथे शुक्रवारी पोस्टरचे अनावरण करण्यात आले.यावेळी पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण यांच्या हस्ते खत बुकिंग व खरेदी प्रक्रियेबाबतच्या माहितीपर पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना नव्या ऑनलाइन खत बुकिंग व खरेदी प्रणालीची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या प्रणालीमुळे खत वितरणातील पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना वेळेत व सुलभ पद्धतीने खत उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमात FFS ॲपच्या कार्यपद्धती, फायदे आणि अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील सर्व गावांमध्ये कृषी सेवा केंद्रांच्या माध्यमातून तसेच उपकृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांच्या माध्यमातून या प्रणालीची व्यापक जनजागृती सुरू असल्याची माहिती पंचायत समितीचे कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी दिली.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आरोग्य विभागाचा हरित संदेश

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर,:** पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतिशय जवळचा संबंध असून निरोगी जीवनासाठी स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, स्वच्छ परिसर आणि हरित वातावरण आवश्यक असल्याचा संदेश देत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा आरोग्य विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. माननीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नागेश सावरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता व जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले.

"माझं गाव – आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत यावर्षी पर्यावरण संवर्धनाचा विषय विशेषत्वाने समाविष्ट करण्यात आला. उपकेंद्र कुंभेफळ, पिसादेवी व हिवरा येथे वृक्षारोपण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र वरुडकाजी येथे नवीन इमारतीसमोर वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र दौलताबाद येथे पर्यावरण संवर्धन, वाढते प्रदूषण, हवामान बदल, वृक्षारोपणाचे महत्त्व तसेच स्वच्छता आणि आरोग्य याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. उपकेंद्र वडगाव कोल्हाटी येथे स्वच्छता मोहीम राबवून कचरा संकलन करण्यात आले, तर प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपरी राजा येथेही वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमांमध्ये वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने विविध उपक्रमांद्वारे जनजागृती केली.

## 'तुम से तुम तक'च्या लग्नसोहळ्यात चाहत्यांचा खास सहभाग

तभा वृत्तसेवा




छत्रपती संभाजीनगर, झी टीव्हीवरील लोकप्रिय 'तुम से तुम तक' मालिकेत भारतीय टेलिव्हिजनवर पहिल्यांदाच एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे. मालिकेतील अनु आणि आर्य यांच्या भव्य लग्नसोहळ्यात बेंगळुरूहून आलेल्या दोन वास्तविक जोडप्यांना त्यांच्या मुलींसह सहभागी होण्याची संधी देण्यात आली.

विशेष म्हणजे या दोन्ही जोडप्यांच्या लग्नाच्या तारखा अनु आणि आर्यच्या लग्नाच्या तारखेशी जुळत असल्याने हा अनुभव त्यांच्यासाठी अधिक भावनिक ठरला. झी टीव्हीने आपल्या निष्ठावान प्रेक्षकांना मुंबईतील सेटवर आमंत्रित करून त्यांच्या आवडत्या ऑन-स्क्रीन जोडप्याच्या लग्नाचा प्रत्यक्ष अनुभव दिला. सेटवरील भव्य वातावरण, विधी आणि उत्सवी माहोल याचा या कुटुंबांनी मनापासून आनंद घेतला.

या उपक्रमामुळे रिअल आणि रील जगाचा सुंदर संगम पाहायला मिळाला. विशेष म्हणजे ही कुटुंबे मालिकेच्या भागातही झळकणार आहेत. आर्यची भूमिका साकारणारे शरद केळकर यांनी प्रेक्षकांचे प्रेम कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले, तर अनुची भूमिका साकारणाऱ्या निहारिका चौक्सी यांनी चाहत्यांशी असलेले भावनिक नाते हा अनुभव अधिक खास बनवत असल्याचे म्हटले.

'तुम से तुम तक' ही मालिका दररोज रात्री ८.३० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## सोयगाव पोलीस स्टेशनमध्ये निसर्गस्नेही स्वागत आणि पर्यावरण दिनाचा संदेश



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.६ जून :** ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'समर्पण फाउंडेशन'तर्फे सोयगाव पोलीस स्टेशनमध्ये एक अत्यंत प्रेरणादायी आणि अभिनव उपक्रम राबवण्यात आला. सोयगाव पोलीस ठाण्याचे नवीन प्रभारी अधिकारी म्हणून आलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर शिवाजीराव गोरे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या नवीन नियुक्तीबद्दल 'समर्पण फाउंडेशन'च्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले.त्यांना फुलांचे नव्हे तर निसर्गाचे' प्रतीक म्हणून एक रोप देऊन स्वागत करण्यात आले.त्यांच्या भावी वाटचालीस फाउंडेशनतर्फे खूप खूप शुभेच्छा दिल्या.याच आनंदाच्या क्षणी,'जागतिक पर्यावरण दिना' निमित्त समर्पण फाउंडेशन आणि सोयगाव पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने,पोलीस स्टेशन हद्दीतील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.पोलीस अधिकारी,कर्मचारी आणि फाउंडेशनचे सदस्य यांनी एकत्र येऊन कडुलिंब आणि चिंचेचे रोपे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.तर यावेळी समर्पण फाऊंडेशनचे संपूर्ण टीम उपस्थित होते.